सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १२ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राष्ट्रपती भवनात पहिल्यांदाच लग्न सोहळा

### मदर टेरेसा क्राऊन परिसरात पार पडला ऐतिहासिक सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ नवी दिल्ली**

देशाची शान असणाऱ्या राष्ट्रपती भवनामध्ये पहिल्यांदाच लग्नसोहळा आयोजित करण्यात येणार आहे. लोक मोठमोठी हॉटेल, बँक्वेट हॉल बुक करतात. परंतू, या नवरीने तर राष्ट्रपती भवनच लग्नासाठी बुक करून टाकले आहे. तुम्हाला आश्चर्य वाटले असेल परंतू हे खरे आहे. राष्ट्रपती भवनात लग्न सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



उत्तर प्रदेशच्या देवरियाचे भाटपार रानी येथील बडका गावाचे रहिवासी अवनीश तिवारी हे सीआरपीएफमध्ये असिस्टंट कमांडर आहेत. अवनीश यांचे लग्न मध्य प्रदेशच्या शिवपुरीच्या पुनमसोबत ठरले आहे. त्या राष्ट्रपतींच्या पीएसओ असिस्टेंट कमांडर आहेत. म्हणून हे लग्न खासकरून राष्ट्रपती भवनात पार पडला

आज या दोघांचे लग्न आहे. राष्ट्रपतींनी या लग्नाला राष्ट्रपती भवनात होऊ देण्याची परवानगी कशी दिली असा सवाल तुमच्या मनात आला असेल. अहो, वरात देखील राष्ट्रपती भवनात मंगळवारीच पोहोचली आहे. अवनीशच्या गावात त्याच्या लग्नाचीच चर्चा आहे. या लग्नाला परवानगी कशी मिळाली यावर त्याचे काका सांगतात की, पूनमचे काम, तिचे वागणे यामुळे प्रभावित होऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लग्नाला परवानगी दिली आहे.अवनीश हे जम्मू-काश्मीरमध्ये तैनात आहेत. राष्ट्रपती भवनाच्या मदर टेरेसा क्राऊन परिसरात हे लग्न सुरु आहे. या लग्नाला केवळ ९४ जणांना परवानगी देण्यात आली आहे. आता राष्ट्रपती भवन सामान्यांना अशी लग्न करण्याची परवानगी देईल का, असा सवाल तुमच्या मनात आला असेल तर त्याचे उत्तर आहे, नाही. ही परवानगी केवळ पुनम यांनाच देण्यात आली आहे. यापुढे राष्ट्रपती भवनाचे अधिकारी जर लग्न करणार असतील तर त्यांना अशी परवानगी दिली जाईल का, या प्रश्नावर येणारा काळच उत्तर देईल.

## बंगालच्या राज्यपालांनी ममता बॅनर्जींना पाठवली ११ कोटींची नोटीस, आणखी ३ नेते रडारवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२कोलकाता**

पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि राज्यपाल, यांच्यात पुन्हा तणाव वाढल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यपाल सीव्ही आनंद बोस, यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, कुणाल घोष आणि तृणमूल काँग्रेसच्या दोन आमदारांना मानहानीची नोटीस पाठवली आहे. या नोटीसमध्ये तृणमूल नेत्यांनी राज्यपालांची बदनामी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत तातडीने माफी मागितली नाही, तर ११-११ कोटी रुपयांचा मानहानीचा दंड ठोठावला जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.



तृणमूलच्या आमदार सायंतिका बॅनर्जी आणि रयत हुसैन सरकार, यां ही नोटीस पाठवण्यात आली आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच राज्यपालांनी मुख्यमंत्री आणि आमदारांना बदनामीची नोटीस पाठवली आहे.


मे २०२४ मध्ये बंगाल विधानसभेच्या २ जागांवर पोटनिवडणुका झाल्या, ज्यामध्ये बारानगर जागेवरून सायंतिका बॅनर्जी आणि भगवान गोला जागेवरून रयत सरकार विजयी झाले. दोन्ही आमदारांच्या शपथविधीबाबत अडचण निर्माण झाली होती. राज्यपालांनी विधानसभा अध्यक्षांना शपथ घेण्याचा अधिकार दिला नाही. त्या दोघांनाही उपसभापतींनी शपथ देण्यास सांगितले. पणष या दोन्ही आमदारांनी राजभवनात जाऊन शपथ घेण्यास नकार दिला.राजभवन सुरक्षित नसल्याचा दावा या आमदारांनी केला. हा संपूर्ण प्रकार घडत असताना बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजभवनाबाबत गंभीर टीका केली होती. राजभवनात महिला सुरक्षित नसल्याचे ममता म्हणाल्या. मात्र, कोलकाता उच्च न्यायालयाने ममतांना राजभवनाबाबत अशी टिप्पणी करू नये, असे सांगितले होते. या घटनेदरम्यान दोन्ही आमदारांनी राज्यपालांवर गंभीर आरोप केले होते, ज्यासाठी आता कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे.

## राम मंदिराचे मुख्य पुजारी सत्येंद्र दास यांचे निधन

### वयाच्या ८५ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अयोध्या**

राम मंदिराचे मुख्य पुजारी सत्येंद्र दास यांचे निधन झाल्याचे वृत्त 'एएनआय' या वृत्तसंस्थेनं दिले आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी लखनौ पीजीआयमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आचार्य सत्येंद्र दास यांना ३ फेब्रुवारी रोजी स्ट्रोकनंतर गंभीर अवस्थेत लखनौ पीजीआयच्या न्यूरोलॉजी वॉर्डच्या एचडीयूमध्ये दाखल करण्यात आले होते.



आचार्य सत्येंद्र दास यांचे शिष्य प्रदीप दास यांनी सांगितले की, दीर्घ आजारानंतर सकाळी आठ च्या सुमारास लखनऊच्या पीजीआयमध्ये त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव पीजीआयमधून अयोध्येत आणले जात आहे. शिष्यांनी त्यांचे पार्थिव अयोध्येत नेले आहे. उद्या, १३ फेब्रुवारीला अयोध्येतील सरयू नदीच्या तीरावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. नुकतेच पीजीआयने एक हेल्थ बुलेटिन जारी केले होते ज्यात सत्येंद्र दास यांना मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारखे गंभीर आजार असल्याचे म्हटले होते.सत्येंद्र दास यांनी सुमारे ३३ वर्ष राम मंदिराची सेवा केली. फेब्रुवारी १९९२ मध्ये 'वादग्रस्त जमिनी'मुळे रामजन्मभूमीची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर गेली तेव्हा जुने पुजारी महंत लालदास यांना हटवण्याची चर्चा होती. दरम्यान, १ मार्च १९९२ रोजी भाजपचे खासदार विनय कटियार, विश्व हिंदू परिषदेचे नेते आणि तत्कालीन विहिंप प्रमुख अशोक सिंघल यांच्या संमतीने सत्येंद्र दास यांची नियुक्ती करण्यात आली. सत्येंद्र दास यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, त्यांनी १९७५ मध्ये संस्कृत विद्यालयातून आचार्य पदवी प्राप्त केली होती.

## शिंदेंचं कौतुक, ठाकरेंचा संताप! शिंदेसेनेच्या नेत्यांनी संजय राऊतांना सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शरद पवारांच्या हस्ते दिल्लीत सत्कार करण्यात आला. महादजी शिंदे नावाचा पुरस्कार देऊन एकनाथ शिंदेंना गौरवण्यात आले. परंतु याच सन्मान सोहळ्यावरून महाराष्ट्रातील राजकारण पेटलं आहे. संजय राऊतांनी सकाळी सकाळी पत्रकार परिषद घेत थेट शरद पवारांना टार्गेट केले. महाराष्ट्राच्या शत्रूंना असे पुरस्कार देणे कुणालाही रूचले नाही असं सांगत ठाकरे गटाने शरद पवारांसह एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला. मात्र राऊतांच्या टीकेवरून शिंदेसेनेच्या नेत्यांनी राऊतांना सुनावले आहे.



मंत्री शंभुराज देसाई म्हणाले की, संजय राऊत स्वत:ला विश्वज्ञानी प्रवक्ते समजात. विश्वातलं परिपूर्ण ज्ञान त्यांनाच आहे आणि त्याच्याविरूद्ध कुणी भूमिका घेतली तर त्यांना खपत नाही. शरद पवारांच्या भूमिकेपेक्षा विसंगत भूमिका तुमची असेल मग महाविकास आघाडीतून बाहेर पडा. संजय राऊतांना वैफल्य आलं आहे. उबाठाचं राजकीय स्थान दिवसेंदिवस खाली जात चाललंय, त्याला कारणीभूत संजय राऊत आहे. पक्ष कुणाचा, चिन्ह कुणाचे हे ठरवण्याचा अधिकार संजय राऊतांना नाही. केंद्रीय निवडणूक आयोग, सुप्रीम कोर्ट इथं आम्ही आमचे पुरावे दिले, कागदपत्रे दिले, प्रतिज्ञापत्र दिले. त्यानंतर निवडणूक आयोगाने आमची शिवसेना खरी असा निर्णय दिला. या निर्णयाला सुप्रीम कोर्टानेही स्थगिती दिली नाही. आमचे नाव तेच चिन्हही तेच आहे. पक्ष फोडायचा विषयच येत नाही. २०१९ ला ज्यांच्याविरोधात आपण निवडणूक लढलो त्यांच्यासोबत जात सत्तेत बसला, त्याचे उत्तर आधी द्यावे असा टोला त्यांनी लगावला. तर संजय राऊत स्वत:ला एवढे मोठे समजतात की शरद पवारांनी काय करावे आणि काय नाही हे सांगतात. ज्यांना गद्दार म्हणताय त्यांच्या मतांवर तुम्ही निवडून आलात मग राजीनामा द्यावा. शिवसेना-भाजपा म्हणून विधानसभा निवडणूक लढली आणि सत्तेसाठी तुम्ही कोणासोबत गेला, तेव्हा लोकांच्या मतांची गद्दारी केली. आपली योग्यता काय हे विधानसभा निवडणुकीत लोकांनी दाखवून दिले. मशिदीत जाऊन पाया पडत होते. बाळासाहेबांच्या विचारांची गद्दारी यांनी केली. रणांगणात एकनाथ शिंदे लढले, बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली त्यांच्याशी लढले आणि बाळासाहेबांच्या विचारांशी पक्ष बांधून ठेवला. महाराष्ट्रातील जनतेने त्याचे फळ निवडणुकीच्या निकालात दिले आहे असं खासदार नरेश म्हस्के यांनी म्हटलं.

दरम्यान, शरद पवार हे देशाचे नेते आहेत. त्यांनी एकनाथ शिंदेंचा सन्मान केला. त्यांच्या भाषणात एकनाथ शिंदेंचं कौतुक केले. ज्या व्यक्तीनं ५६ वर्ष महाराष्ट्रासाठी योगदान दिले त्या शरद पवारांनी एकनाथ शिंदेंचं कौतुक करून त्यांचे नेतृत्व सर्वमान्य आहे यावर शिक्कामोर्तब केलं आहे. त्यामुळे काही लोकांना पोटशूळ उठला आहे. एकनाथ शिंदे यांचं कौतुक करणारा माणूस त्यांच्यासाठी वाईट असतो म्हणून ते शरद पवारांवर बोलतायेत. साहित्य संमेलनाला दलाली म्हणत असतील तर हा खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा आणि मराठी माणसाचा अपमान आहे असं घणाघात मंत्री उदय सामंत यांनी संजय राऊतांवर केला.

## नाईन्टी घेऊन कधी आघाडी टिकते का?:भाजपचा महाविकास आघाडीला टोला

### राऊतांना महाराष्ट्राची संस्कृती समजली नसल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राचे सरकार पाडले, बेईमानी केली त्यांच्या कार्यक्रमाला शरद पवारांनी जायला नको होते, असे म्हणत शरद पवारांवर हल्लाबोल केलाय. यावरून महाविकास आघाडी वादाची ठिणगी पडल्याचे पाहायला मिळत असून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी संजय राऊतांना खोचक टोला लगावलाय.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्राची संस्कृती संजय राऊतांना समजलीच नाही. एखाद्या पुरस्काराची निवड करणे आणि सत्कार करणे ही संस्कृती आहे. संजय राऊत शरद पवार



यांना सल्ले द्यायला लागला आहे, ते सल्ला घेतील का? राऊत का चिडचिड करत आहे माहिती नाही. राऊतांची उंचीच नाही, त्यांनी एक तरी निवडणूक लढवली आहे का? त्यांनी एका तरी विधानसभेत निवडणूक लढवून दाखवावी. अमित शाहांनी ११ निवडणुका लढल्या आहेत, प्रत्येक निवडणुका ते जिंकलेत. अमित शाह कुठे आणि संजय राऊत कुठे? असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली.

**९० घेऊन कधी युती टिकते का?**

आम्ही लोकसभेच्या पराभवातून शिकलो आणि विधानसभा जिंकलो. महाविकास आघाडीने ९०-९०-९० घेऊन युती केली होती. ९० घेऊन कधी युती टिकते का? नाना पटोले, जयंत पाटील आणि संजय राऊत यांनी ९० घेतली, त्यामुळे त्यांची युती टिकली नाही, आमची टिकली. आम्ही जनतेत गेलो, दौरे केले, प्रत्येक विधानसभेत आमचे कार्यकर्ते होते. तुम्ही काही या पिसाळलेल्या माणसाच्या मागे लागू ना, असा टोला देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी लगावला.

## कृषी पंपधारकांची फसवणूक; निवडणुकीपूर्वी वीज बिल शून्य, आता भरा थकबाकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांची मते मिळवण्यासाठी एप्रिल ते जून २०२४ अखेरपर्यंतची साडेसात अश्व शक्तीपर्यंतच्या सर्व कृषी पंपधारकांना वीज बिले शासनाने शून्य करून दिली, परंतु आता डिसेंबरपासून पूर्ववत पोकळ थकबाकीसह बिले दिली आहेत. अनेकांची वीज बिले ५० हजारांच्यावर असल्याने कृषी पंपधारकांची



झोप उडाली आहे.

गेल्या अर्थसंकल्पाच्या अधिवेशनात अर्थमंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी साडेसात अश्वशक्तीपर्यंतचे थकीत आणि चालू वीज बिल माफ, अशी घोषणा केली. तोंडावर विधानसभा निवडणूक असल्यामुळे याची अंमलबजावणीही सुरू केली. त्यानंतरचे तीन महिन्यांचे कृषी पंपाचे वीज बिल शून्य म्हणून दिले आहे. कृषी पंपधारक बिलावर थकीत रक्कम नाही, चालू बिलही शून्य आहे, हे पाहून सुखावला आहे.

निवडणुकीत मतदान करून पुन्हा महायुतीसरकारला निवडून दिले. महायुतीचेसरकार पुन्हा सत्तेवर आले. त्यावेळी उपमुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस आता मुख्यमंत्री झाले आहेत. उपमुख्यमंत्री अर्थमंत्री त्यावेळचेच आहेत. तरीही, कृषी पंपधारकांना वीज बिल थकबाकीसह दिले आहे. चालू देयक शून्य, असे म्हटले आहे. यामुळे कृषी पंपधारकांची फसवणूक झाल्याची भावना तयार झाली आहे.

**बिल आले, फोटो गायब**

मागील कोणत्याही थकीबाकीचा उल्लेख नाही, अशा शून्य वीज बिल आलेल्या बिलावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यावेळचे माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे ठळक फोटो होते. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या शेती पंपांना मोफत वीज, १४ हजार ७६१ कोटींची तरतूद, असा आशय होता. आताचे बिल थकीबाकीसह आले आहे. त्या बिलावरून मागील बिलावरील फोटो मात्र गायब आहेत.

## साळवींचा प्रवेश भाजपची चिंता वाढवणारा शिंदेंच्या आमदाराने प्लान सांगितला

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १२ रत्नागिरी**

तब्बल १५ वर्षे आमदार राहिलेल्या राजन साळवींनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे. पक्षाच्या उपनेतेपदाचा त्यांनी राजीनामा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून ते पक्षात नाराज होते. २००९ ते २०२४ अशी १५ वर्षे आमदार राहिलेल्या साळवींचा गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत राजापूर मतदारसंघात पराभव झाला. तेव्हापासून त्यांच्या पक्षांतराची चर्चा सुरु होती. ते उद्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. साळवींचं पक्षांतर ठाकरेंसाठी धक्का मानला जात आहे. साळवी भाजपमध्ये जातील, अशी चर्चा असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी त्यांना आपल्याकडे खेचत भाजपलादेखील शह दिला आहे.



एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वात शिवसेनेत २०२२ मध्ये मोठं बंड झालं. त्यावेळी आमदार असलेल्या राजन साळवींनी ठाकरेंची साथ सोडली नाही. तपास यंत्रणांचा ससेमिरा मागे लागूनही ते ठाकरेंसोबत कायम राहिले. पण २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या किरण सामंत यांनी त्यांचा पराभव केला. २००९, २०१४, २०१९ असे सलग तीनवेळा निवडून आलेल्या साळवींना सामंतांनी पराभवाचा धक्का दिला. तेव्हापासूनच त्यांच्या पक्षांतराची चर्चा सुरु होती. त्यांच्या शिवसेना प्रवेशाला स्थानिक आमदार आणि मंत्री उदय सामंतांचे बंधू किरण सामंत यांचा विरोध असल्याचं बोललं गेलं. पण आता किरण सामंतांनी साळवींचं पक्षात स्वागत केलं आहे.

## संपादकीय ......

# कॉपीमुक्त परीक्षेसाठी सर्वांनी सज्ज होऊ या!

*गेल्या वर्षी अहमदनगर (अहल्यानगर) जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील परीक्षा केंद्रावर ताबा घेत हातात काठ्या घेऊन काही तरुणांनी आधी शिक्षिकेला धमकावले आणि नंतर खुलेआम विद्यार्थ्यांना कॉपी पुरविल्याची घटना समोर आली होती. त्यामुळे एकाही शिक्षकाने त्यांना प्रतिकार करण्याचे धाडस दाखवले नाही. विशेष म्हणजे केंद्रावर कोणताही पोलिस बंदोबस्त नव्हता. परीक्षा केंद्रावरील एका शिक्षिकेने संबंधित युवकांना रोखण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या भ्रमणध्वनीमध्ये त्याची चित्रीत देखील काढली होती. धुडगूस घालणाऱ्या युवकांनी शिक्षिकेला दमदाटी केली. ही संपूर्ण चित्रीत समाज माध्यमावर प्रसारित झाल्यानंतर मंडळाने ही बाब गांभीर्याने घेऊन या प्रकाराच्या चौकशीसाठी त्रिस्तरीय समिती नेमली आहे.*

*कॉपी हा वर्तमान शिक्षण व्यवस्थेला लागलेला शापच म्हणावा लागेल. कुठलेही कष्ट, मेहनत न करता यश मिळवायचे अशी नीतिशून्य धारणा समाजात यानिमित्ताने दिसून येते. सामूहिक कॉपी व संबंधित यंत्रणेकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मिळणारे अभय ही एक फक्त कृती नसून सामाजिक-नैतिक मूल्यांची घसरण दर्शवणारी प्रवृत्तीच म्हणावी लागेल. चरहरीरिहीर इरीव शुरा मूल्यरहित समाजव्यवस्थेचे बीजांकुर शिक्षणातील गैरप्रकारामुळे रुजले जाणे निश्चितच अधिक धोकादायक संभवते. जीवघेण्या स्पर्धेमुळे कॉपी, मूल्यमापनातील गैरप्रकार, पेपरुटी असे प्रकार शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनले आहेत, हे कोणीच नाकारू शकत नाही. काही नामांकित शिक्षण संस्था वगळता ग्रामीण भागातील शाळा १०० टक्के निकालाचे धनुष्य पेलण्यासाठी स्वतः शिक्षक- मुख्याध्यापक-संस्थाचालक यांनी कॉपीचा अंगीकार केला असल्याचे दिसून येत आहे.कुंपणानेच शेत खाण्याचा हा प्रकार असल्यामुळे कॉपीमुक्त परीक्षा महाराष्ट्रासाठी दिवास्वप्न ठरत आहे. विदर्भाच्या मराठवाडा-खान्देश सीमेवर असलेल्या जालना जिल्ह्यालगत व जळगाव खान्देशच्या लागून असलेल्या गावात कॉपीचे प्रकार अतिशय उघडपणे होत होते. पालक-प्रसार माध्यमांनी ओरड केल्यावर बोर्डाने गैरमार्गाविरुद्ध लढा अभियान राबविले. चरहरीरिहीर इरीव शुरा अर्थातच तेही सरकारी धोरणाप्रमाणे निव्वळ धूळेक केवळ बोभाटा; प्रत्यक्ष कारवाई शून्य. या अभियानाचे एकमात्र यश उघडपणे घडत होते, ते आता पडद्याआड घडते आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षकांशी संवाद साधला आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना तणावविरहित वातावरणात बोर्डाच्या परीक्षेपूर्वी ताण कमी करण्यासाठी आणि परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविण्यासाठी सूचना व उपाय सांगितला आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखली पाहिजे. एखादा विद्यार्थी रोबोट यंत्र तयार करीत असेल त्याकडे लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांची क्षमता ओळखून सकारात्मक दृष्टीने पालक व शिक्षकांनी बघितले पाहिजे. विद्यार्थ्यांनी मनात विजयाचा भाव ठेवून संकोच न करता प्रत्येक प्रश्न शिक्षकांना विचारला पाहिजे. चरहरीरिहीर इरीव शुरा अन्यथा हाच प्रश्न मनावर परिणाम करून स्फोट होऊ शकतो. योगा व प्राणायामद्वारे मनातील तणाव दूर होतो. वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्र याकडे असलेला कल पाहता मुलांमध्ये खेळाविषयी आकर्षण असल्यास त्याला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. इतर विद्यार्थ्यांशी तुलना न करता स्वतःची क्षमता ओळखून स्पर्धा करा. जीवघेण्या स्पर्धेमुळे कॉपी, मूल्यमापनातील गैरप्रकार, पेपरुटी असे प्रकार शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनले आहेत, हे कोणीच नाकारू शकत नाही. काही नामांकित शिक्षण संस्था वगळता ग्रामीण भागातील शाळा १०० टक्के निकालाचे धनुष्य पेलण्यासाठी स्वतः शिक्षक- मुख्याध्यापक-संस्थाचालक यांनी कॉपीचा अंगीकार केला असल्याचे दिसून येत आहे.कुंपणानेच शेत खाण्याचा हा प्रकार असल्यामुळे कॉपीमुक्त परीक्षा महाराष्ट्रासाठी दिवास्वप्न ठरत आहे. विदर्भाच्या मराठवाडा-खान्देश सीमेवर असलेल्या जालना जिल्ह्यालगत व जळगाव खान्देशच्या लागून असलेल्या गावात कॉपीचे प्रकार अतिशय उघडपणे होत होते.परीक्षा देताना आत्मचिंतन करून निर्भयपणे जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग निवडा, असे मौलिक मार्गदर्शन करणारे देशाचे एकमेव पंतप्रधान नरेंद्र मोदी ठरले आहेत.*

# कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून अमरावतीकरांना पर्वणी

## कुटुंबियांसह आवजून भेट द्या

कृषिज्ञान, खवय्यांसाठी अस्सल वैदर्भीय खानावळींचे स्टॉल्स, विविध खाद्य पदार्थांची रेलचेल, बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांची मैफलअमरावती शहरात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेमार्फत दि. १४ ते १८ फेब्रुवारी दरम्यान सायन्सस्कोर मैदानावर कृषी विकास परिषद व प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. आत्माच्या वतीने पाच दिवसीय कृषी प्रदर्शनात कृषिज्ञान, खवय्यांसाठी विविध खाद्य पदार्थांची रेलचेल, बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांची मैफल आयोजित करण्यात आली आहे. यात कृषिविषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहितीही मिळणार आहे.

सकाळी दहा ते रात्री दहा वाजेपर्यंत कृषीविषयक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मिर्झा एक्सप्रेस, सुर नवा ध्यास नवा, हास्याचे तिखे बोल या कार्यक्रमांचे विशेष आकर्षण आहे. या प्रदर्शनीत धान्य, खाद्य, सेंद्रिय शेतमाल, शासकीय योजनांच्या माहितीसाठी स्टॉल्स राहणार आहेत. तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानासाठी कृषीला लागणाऱ्या मशिनरी आणि अवजारांचे प्रदर्शन राहणार आहे. सेंद्रीय शेतमालाची विक्रीशिवाय निविष्ठा कंपन्यांचा सहभागही राहणार आहे.

प्रदर्शनी दरम्यान दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता मिर्झा एक्सप्रेस फेम डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचा विनोदी कार्यक्रम, दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता कलर्स मराठी टीव्ही फेम साहिल पांढरे यांचा सुर नवा ध्यास नवा, चला हवा येऊ द्या फेम प्रविण तिखे यांचा हास्याचे तिखे बोल हे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. प्रदर्शनीत २०० स्टॉल्स राहणार आहेत. यातून



**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,अमरावती

नागरिकांना शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रदर्शनीच्या ठिकाणी सुरक्षा, आरोग्य पथक तैनात राहणार आहे.

कृषी प्रदर्शनीचे आयोजन मोठ्या स्वरूपात करण्यात आले आहे. सर्वांनी कुटुंबियांसह आवर्जून भेट द्या. विद्यार्थ्यांमध्ये जागृती होण्यासाठी याठिकाणी शाळांच्या सहली देखील येणार आहेत. या प्रदर्शनाच्या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवून त्यांचा उद्योजकीय विकास घडवून आणणे, त्यांना सातत्याने रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यांनी तयार केलेल्या वस्तूंची बाजारपेठेशी सांगड घालून देण्याचे काम प्रदर्शनीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. जिल्हा कृषी प्रदर्शनामध्ये स्वयंसहायता महिला बचत गटांचे स्टॉल्स लागणार आहेत. विविध हस्तकलेच्या वस्तू तसेच तयार खाद्य पदार्थ, धान्य यांचे स्टॉल्स तसेच नित्योपयोगी वस्तूंचे स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. येथे अस्सल वैदर्भीय खानावळीचे स्टॉल्स लागणार आहेत. बचतगटातील महिलांना, शेतकरी बांधवांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी कृषी प्रदर्शनीला आवर्जून भेट द्यावी.

# आंबा पिकातील फळगळ रोखण्यासाठी करा हे सोपे उपाय

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक** – इतर फळपिकांप्रमाणे आंबा पिंकामध्येही फुल व फळगळ होते. किड, रोग, हवामान बदल, जमिनीतील ओलावा इ. कारणांमुळे फळगळ होऊ शकते.फुले येतात तेवढी फळधारणा होत नाही कारण झाडात जेवढी फळ पक्वतेची ताकत असते तेवढीच फळे झाडाला लागतात व अखेरपर्यंत फळ गळ चालूच असते.




**आंबा फळगळीसाठी उपाय–** कोरडे हवामान आणि तापमानात होणारी वाढीमुळे झाडाला ताण बसून फळगळ होण्याची शक्यता असते. वाटाणा ते सुपारी आकाराच्या फळांच्या अवस्थेत असलेल्या आंबा फळांची फळगळ कमी करण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्यातून एकदा १०० लिटर पाणी प्रति झाड किंवा १५ दिवसातून एकदा १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात फळे वाटाणा आकारापासून ते सुपारी आकाराची होईपर्यंत द्यावे.

मोहोर अवस्थेत असलेल्या आंब्यामधील परागीकरण वाढविण्यासाठी मोहोर फुललेल्या अवस्थेत असताना सकाळच्या वेळेस (सकाळी ९ ते १२ वा.) हलका हलवून घ्यावा. फळधारणा झालेल्या झाडावरील मोहोरातील सुकलेल्या अवस्थेतील नर फुले दुपारच्या वेळेस कडक उन्हामध्ये झाडून घेतला असता किड व रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते, कीटकनाशकाची फवारणी अधिक प्रभावशाली होवून फळांची वाढ चांगली होते.







आंबा फळांची गळ कमी करण्यासाठी आणि फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना अशा एकूण तीन फवारण्या कराव्यात.

वाढणारे कमाल तापमान लक्षात घेता हापुस आंब्यामध्ये फळगळ कमी करण्यासाठी फळे वाटाण्याच्या आकाराची झाल्यावर २० पीपीएम नॅप्थेलीन ॲसीटीक ॲसीड (१ ग्रॅम ५० लिटर पाण्यातुन) या संजिवाचे द्रावण मोहोरावर फवारावे. दुसरी फवारणी फळे गोटीच्या आकाराची झाल्यावर करावी. नॅप्थेलीन ॲसीटीक ॲसीड प्रथम थोड्या अल्कोहोलमध्ये विरघळुन नंतर पाण्यात मिसळावे.

आंबा फळांचे फळमाशी पासून तसेच प्रखर सूर्यकिरणांपासून संरक्षण करण्यासाठी तसेच फळांचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, गोटी ते अंडाकृती आकाराच्या आंबा फळांना डॉ.बा.सा.कों.कृ. विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार २५ , २० सें.मी. आकाराच्या कागदी/ वर्तमानपत्रापासून बनविलेल्या पिशव्यांचे आवरण घालावे. आवरण घालताना फळाच्या देठाकडे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.




## मेंदूची ताकद वाढवणारे पाहा सोपे व्यायाम, ताण होतो कमी-वाढतो कामावरचा फोकस

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

आपलं मानसिक आणि शारीरिक आरोग्य एकमेकांवर अवलंबून असतं. आपण नेहमीच ऐकत असतो की, फिजिकल ॲक्टिविटीनं फिजिकल हेल्थ सोबतच मेंटल हेल्थवरही प्रभाव पडतो. फिजिकल ॲक्टिविटी जसे की, एक्सरसाईज, जिम, चालणं किंवा धावणं या गोष्टीही आपल्या मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर असतात. रोज काहीना काही फिजिकल ॲक्टिविटी केली तर मेंटल हेल्थ चांगली राहण्यासोबतच स्ट्रेस, मूड स्वींग, डिप्रेशन, चिंता, एडीएचडीसारख्या मानसिक समस्यांपासूनही सुटका मिळते. सोबतच झोपेची क्वालिटीही सुधारते.

**स्ट्रेस कंट्रोल होतो**

धावणं, सायकल चालवणं, स्वीमिंग यांसारख्या फिजिकल ॲक्टिविटी मेंदुमध्ये एंडॉर्फिन आणि सेराटोनिन सारखे हॅप्पी हार्मोन्स रिलीज होतात. हे हार्मोन्स तणाव आणि चिंता कमी करतात. ज्यामुळे मेंटल हेल्थ चांगली राहते. मनाला शांतता मिळते आणि संतुलन जाणवतं.

मेंदुची क्षमता वाढते

ोज फिजिकल ॲक्टिविटी केल्यास मेंदुतील महत्वाचे भाग जसे की, हिपोकॅम्पस नवीन न्यूरॉन्स बनवण्याचं काम करतात. रिसर्चनुसार, रोज एखादी एक्सरसाईज केल्यास मेंदुची क्षमताही वाढते.

मूड चांगला होतो

एक्सरसाईज केल्यानं मेंदुमध्ये डोपामाइन, सेराटोनिन आणि नॉरएपिनफ्रिन सारखे न्यूरोट्रान्समीटरची लेव्हल वाढते. जे मानसिक आरोग्यासाठी गरजेचे असतात. याचा थेट प्रभाव तुमच्या मूडवर




पडतो. तुम्हाला जास्त आनंदी आणि उत्साही वाढतं. तुमचा तणावही कमी होतो.

**चांगली झोप**

रोज काहीना काही फिजिकल ॲक्टिविटी केली तर झोपेची क्वालिटी सुधारण्यास मदत मिळते. फिजिकल ॲक्टिविटी केल्यानं शरीर थकतं आणि त्यामुळे गाढ झोप येते.

डिप्रेशन आणि एंग्झायटी होईल कमी

एक्सरसाईजमुळे मेंटल हेल्थ चांगली राहण्यास खूप मदत मिळते. खासरून डिप्रेशन आणि एंग्झायटीच्या केसमध्ये. फिजिकल ॲक्टिविटी केल्यास शरीरात तणाव कमी करणारे केमिकल्स वाढतात. ज्यामुळे डिप्रेशन, चिंता दूर होते.

# श्री गजानन विजय ग्रंथाचे पार्वतीनगरात उद्या पारायण

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.११अमरावती** पार्वतीनगर नं. २, अकोली रोड येथील श्री गजा राजि मंदिरात गुरुवारपासून (दि. १३) श्री संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण होणार असून, शरद महाराज चौधरी हे ग्रंथ वाचक आहेत.

सकाळी ६ वाजता तीर्थस्थापनेने महोत्सवाला सुरुवात होईल. श्रींचा अभिषेक व महापूजेने सकाळी ६ वाजता दैनंदिन कार्यक्रमांना प्रारंभ होईल. ७ वाजता काकडा आरती, ११ वाजता विजयग्रंथाचे सामूहिक पारायण, दुपारी ३ वाजता महिलांचे भजन, सायंकाळी ६ ला हरिपाठ, ७ ला आरती, रात्री ८ वाजता भजन होईल. मंगळवारी (दि. १८) सायंकाळी साडेसहा



वाजता दीपोत्सव व पारायणाची समाप्ती होईल.

बुधवारी (दि. १९) दुपारी ४ वाजता परिसरातून श्रींची शोभायात्रा काढण्यात येईल. गुरुवारी (दि. २०) सकाळी १० वाजता काल्याच्या कीर्तनानंतर दुपारी साडेबारा वाजता महाप्रसाद वितरणाला सुरुवात होईल. भाविकांनी प्रगट दिवस महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री गजानन महाराज चॅरिटेबल अँड सोशल वेल्फेअर ट्रस्टद्वारे करण्यात आले.

# सकाळी गारवा, दुपारी चटका! पुढील काही दिवसात थंडीत वाढ होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** – सध्या फेब्रुवारी महिना अर्धा होत आला तरी देखील थंडीने मुक्काम हलवलेला नाही. सकाळी आणि रात्री थंडी, तर दुपारी उकाडा जाणवत आहे. या आठवड्यात किमान तापमानात दोन ते तीन अंशाची घट होणार आहे. त्यामुळे थंडीत काहीशी वाढ होण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला.

राज्यामधील अनेक भागामध्ये पुढील तीन दिवस थंडी वाढण्याची शक्यता आहे. त्यामध्ये मुंबई शहर, ठाणे, जळगाव, धुळे, नंदूरबार आणि नाशिक जिल्हा, नगर जिल्ह्यातील अकोला, संगमनेर, कोपरगाव, राहता, श्रीरामपूर तालुका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर, कन्नड, सोयगाव तालुक्यांचा समावेश आहे. ११ ते १३ फेब्रुवारी आणि १७ व




१८ फेब्रुवारी दरम्यान थंडीची शक्यता आहे. बदलत्या वाऱ्यांच्या पॅटर्ननुसार उत्तरेतील थंड वारे, उत्तर व उत्तर-वायव्य महाराष्ट्रापर्यंतच पोहचण्याची शक्यता आहे.

त्यामुळे पहाटे ५ वाजेचे किमान तापमान घसरून या भागात थंडी जाणवेल, असा अंदाज आहे. उर्वरित महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांमध्ये वातावरणात काही बदल जाणवणार नाही.

आतापर्यंतच्या दोन आठवड्याच्या काळात वारंवार दिशा बदलणाऱ्या, पण कमकुवत वाऱ्यांचे अस्थिर वहन महाराष्ट्रावर टिकून आहे. तसेच अधून-मधून महाराष्ट्रावर हवेच्या उच्च दाबातून, प्रत्यावर्ती चक्रीय वाऱ्यामुळे उत्तरेतील थंड वाऱ्यांना भिंतीसारखा अटकाव केला गेला. जोपर्यंत सध्याचा महाराष्ट्रावरील वारा-वहनाचा पॅटर्न बदलत नाही व थंडीपूरक उत्तरेकडून वारा वहन होत नाही, तोपर्यंत थंडीची शक्यता जाणवणार नाही, असा अंदाज खुळे यांनी व्यक्त केला.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १२ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण

# १०० टक्के निधी खर्च करून, अपूर्ण कामे वेळेत पूर्ण करा:



## जिल्हा परिषदेच्या सीईओंनी घेतला गटविकास अधिकाऱ्यांचा क्लास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** मार्च एंडिंगमुळे प्रत्येक विभागात लगीनघाई सुरू आहे. निधी अखर्चित राहिल्यास कारवाई करण्यात येईल. त्यामुळे १०० टक्के निधी खर्च करून अपूर्ण कामे वेळेत पूर्ण करा. जिल्ह्यात निर्माण होणारी पाणीटंचाई, चाऱ्याचा प्रश्न, जलजीवन मिशनची कामे या विषयांवर ही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी गटविकास अधिकाऱ्यांचा क्लास घेतला. ग्रीष्म ऋतुची चाहुल लागली असतानाच ग्रामीण क्षेत्रांमध्ये पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे गतवर्षी करण्यात आलेल्या उपाययोजना व यावर्षी गावांमध्ये असलेली टंचाई यावर तातडीने गाव स्तरावर बैठक लावून उपाययोजना सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

याशिवाय जनावरांसाठी चाऱ्याचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिताही खबरदारी म्हणून उपाययोजना सुरू करण्यास सांगितले आहे. तसेच प्रधानमंत्री आवास, रमाई आवास, शबरी आवास योजनेची कामे, १५ व्या वित्त आयोगाची कामे, सेवा हमी कायदा अंमलबजावणी, आयुष्यमान भारत, जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, नरेगा, ग्रामपंचायत स्तरावर डिजिटल स्क्रीनची उपलब्धता करून देणे, पंचायत आणि ग्रामपंचायत स्तरावर ई ऑफिस प्रणाली तातडीने कार्यान्वित करणे, त्याकरिता येणाऱ्या अडचणी सुद्धा त्यांनी समजून घेत उपाययोजनेकडे दुर्लक्ष व आनागोंदी करणाऱ्या अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. बैठकीला अतिरिक्त सीईओ प्रीती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस आदींसह विभागप्रमुख व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

**या विषयावर चर्चा :**


घरकुलासाठी ज्यांच्याकडे जागा नाही, त्यांना जागा उपलब्ध करून देणे, घरकुलाकरिता मनरेगामधील मजुरांनाच प्राधान्य देणे, अपूर्ण घरकूल पूर्ण करणे, पाणी पट्टी व घर टॅक्सची वसुली वाढवणे या विषयावर बैठकीत चर्चा करण्यात आली आहे.

# पहिल्याच पेपरला राज्यातून ४२ कॉपी प्रकरणे

## अमरावती विभागातून २ प्रकरण आली समोर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१२अमरावती–** पालक व विद्यार्थ्यांची परीक्षेला वेळेत पोहोचण्यासाठी चाललेली घाईगडबड ... पालकांच्या दुचाकीवर पाठीमागे बसून शेवटच्या क्षणीही मुला –मुलींची वही हातात घेऊन वाचण्यासाठीची धडपड... प्रवेशपत्र घेतले ना? अशी पालकांची सातत्याने होणारी विचारणा... परीक्षेची धाकधूक ..अभ्यास तर केलाय पण पेपर सोपा असेल की अवघड अशी विद्यार्थ्यांच्या मनात चाललेली चलबिचल... असे काहीसे चित्र शहरातील बारावीच्या विविध परीक्षा केंद्रावर पाहायला मिळाले. दरम्यान, मंगळवारी ( दि. ११) राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात येणा–या बारावी परीक्षेच्या सकाळच्या सत्रातील इंग्रजी विषयाच्या पहिल्याच पेपरला राज्यभरात ४२ कॉपीची प्रकरणे आढळली असल्याचे मंडळाने सांगितले. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेस मंगळवारी ( दि. ११) सुरुवात झाली. गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही परीक्षेला निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देण्यात आली. संपूर्ण राज्यात बारावीच्या परीक्षेसाठी एकूण १५ लाख ५ हजार ०३७ इतक्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, त्यामध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले आणि ६ लाख ९४ हजार ६५२ मुली व ३७ तृतीयपंथींचा समावेश आहे. राज्यात १० हजार ५५० कनिष्ठ महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून, या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.




### कॉपी मुक्त अभियान राबवूनही बारावी परीक्षेत ४२ कॉपी प्रकरणे

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने कॉपीमुक्त अभियान हाती घेण्यात आले आहे. परीक्षेपूर्वी मंडळाने कॉपी मुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह देखील राबविण्यात आला. असे असतानाही बारावी परीक्षेत नऊ विभागांमध्ये एकूण ४२ कॉपीची प्रकरणे समोर आली असून, सर्वाधिक प्रकरणे छत्रपती संभाजीनगर विभागात आढळली आहेत. याशिवाय पुणे ८, अमरावती २, नाशिक ३, लातूर १ यात कॉपीची प्रकरणे आढळली आहेत. तर मुंबई, कोल्हापूर, कोकण विभागात एकही कॉपीचे प्रकरण आढळले नाही.–

## महापालिका शाळेत रांगोळी, चित्रकला स्पर्धेला प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती–** मनपा शाळा क्र. २४ मध्ये सहायक आयुक्त धनंजय शिंदे व ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक शारदा गुल्हाने यांच्या उपस्थितीत रांगोळी स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेचे उद्घाटन सहायक आयुक्त धनंजय शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रांगोळी व चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बनंजय शिंदे, शारदा गुल्हाने, स्वास्थ्य निरीक्षक एम. ए. ढेंडवाल, सुमेध मेश्राम, बिभव खरड, सोपान माहुलकर, रोहित डाले, एम. गौहर, सागर राजुरकर, प्रियंका बस तसेच शालेय मुख्याध्यापक व शिक्षक बद, विद्यार्थी तसेच झोन क्र.४ मधील मनपा कर्मचारी, सफाई कामगार, बिटप्यून पस्थित होते.

# २७ किलोमीटर अंतरावर दिले परीक्षा केंद्र, शिक्षण विभागाचा अजब कारभार

**विदर्भ राजासत्ताक**

**दि.१२चां.बाजार–** बारावीची परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली असून तालुक्यातील तळेगाव मोहना येथील शाळेचे परीक्षा केंद्र हे मोर्शी तालुक्यातील कोळविहीर येथे देण्यात आल्याने तालुक्यात शिक्षण विभागाच्या या निर्णयाबाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

चांदूर बाजार तालुक्यामध्ये बारावीचे परीक्षा केंद्र १० असून तळेगाव मोहना या शाळेचे परीक्षा केंद्र हे शिरजगाव बंड येथे राहत होते. मात्र मागील वर्षापासून अचानकपणे ते मोर्शी तालुक्यातील कोळविहीर येथे देण्यात आले आहे. त्यामुळे या गावातील विद्यार्थ्यांना लांबचा प्रवास करून परीक्षा द्यावी लागत असल्याने तालुक्यातील पालक वर्गांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. कोळविहीर हे गाव तळेगाव मोहना या गावापासून २७ किलोमीटरच्या



आसपास असल्याचे बोलले जाते.

या तळेगाव मोहना या गावापासून कोळविहीर परीक्षा केंद्रापेक्षा चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव बंड, चांदूर बाजार, शिरजगाव कसबा, करजगाव व आसेगाव असे जवळचे केंद्र आहे. असे जवळचे परीक्षा केंद्र असताना मोर्शी तालुक्यातील कोळविहीर हे परीक्षा केंद्र या शाळेला कसे देण्यात आले याबाबत तालुक्यामधील पालक वर्गाधून उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे.

तळेगाव मोहना येथील ३७ विद्यार्थी कोळविहीर या परीक्षा केंद्रावर परीक्षा देत आहे. परीक्षा संपेपर्यंत या विद्यार्थांना हेलपाटे घ्यावे लागणार आहे. उन्हाची तीव्रता वाढत असल्याने पालकांची चिंता वाढली आहे. शिक्षण मंडळ काही निर्णय घेते का याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे.

### माहिती न देता केंद्र बदविले

शाळा स्थापन झाली त्या वेळपासून आमचे परीक्षा केंद्र हे शिरजगाव बंड येथे राहत होते. मात्र मागील वर्षापासूनच आम्हाला काहीही माहिती न देता आमच्या शाळेचे परीक्षा केंद्र हे कोळविहीरला देण्यात आले आहे. त्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे!– राहुल गवई मुख्याध्यापक

### पालक, विद्यार्थ्यांची तक्रार नाही

परीक्षा केंद्र हे बोर्डातून ठरत असतात. त्यामुळे आपल्या तालुक्यातील तळेगाव मोहना येथील शाळेचे परीक्षा केंद्र हे मोर्शी तालुक्यातील कोळविहीर येथे बोर्डाने दिले असून यासंदर्भात आमच्याकडून कोणतीही माहिती मागितली गेली नव्हती. तसेच या संदर्भात पालक वर्ग किंवा विद्यार्थ्यांची तक्रार सुद्धा आलेली नाही !. **– वखार अहमद खान**

गटशिक्षणाधिकारी

# खोलापूरच्या सरपंच सरला इंगळे अपात्र घोषित

## आर्थिक अनियमिततेसह कर्तव्यात कसूर केल्याबद्दल दोषी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१२अमरावती :** विभागीय अतिरिक्त आयुक्तांनी भातकुली तहसील अंतर्गत येणाऱ्या खोलापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच सरला दादाराव इंगळे यांना ग्रामपंचायतीतील आर्थिक अनियमितता आणि सरपंच पदाच्या कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल दोषी ठरवले आणि त्यांना सरपंच पदासाठी अपात्र घोषित केले.

यासोबतच, जिल्हा परिषदेच्या सीईओंना महाराष्ट्र सरकारने ३ सप्टेंबर २००२ आणि १८ जून २०२१ रोजी जारी केलेल्या सूचनांनुसार आणि नियमांनुसार अनियमितता आणि अपहाराच्या रकमेबाबत कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, सरपंच सरला इंगळे यांना पदासाठी अपात्र घोषित करण्याबाबत जिल्हा परिषद सीईओ कार्यालयाकडून विभागीय महसूल आयुक्तांकडे अपील दाखल करण्यात आले होते. त्यानंतर आयुक्तालयाने जिल्हा परिषदेच्या सीईओंना या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगितले असते. तुमचा अहवाल ३० दिवसांच्या आत सादर करा. सादरीकरणाची परवानगी देण्यात आली. या प्रकरणाची सुनावणी झाली आणिअहवाल मिळाल्यानंतर दोन्ही पक्षांना त्यांचे युक्तिवाद मांडण्याची संधी देण्यात आली.

ज्यामध्ये जिल्हा परिषदेच्या सीईओंनी सरपंच सरला इंगळे यांनी ग्रामपंचायतीसाठी खरेदी केलेल्या साहित्यात मोठ्या प्रमाणात सरकारी अनियमितता आणि निधीचा गैरवापर केल्याबद्दल आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सादर केली. त्यांनी असेही सांगितले की, यापूर्वी ६ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा, १९५९ च्या कलम ३९ (१) अंतर्गत, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयाने सरपंच सरला इंगळे यांना सरकारी जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत कर्तव्यात कसूर केल्याचे आणि त्या प्रकरणात आर्थिक अनियमितता केल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांना सरपंच पदासाठी अपात्र घोषित केले होते. संपूर्ण प्रकरण ऐकल्यानंतर अतिरिक्त आयुक्त गजेंद्र बावणे यांनी खोलापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच सरला इंगळे यांना पदासाठी अपात्र घोषित करण्याचा आदेश जारी केला आहे. यासोबतच, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना गैरव्यवहार आणि अनियमिततेबाबत सरकारी निकषांनुसार कारवाई करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत.–

# जनावरे चोरणारी कुख्यात टोळी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** चार चाकी वाहनाद्वारे जनावरे चोरी करणार्या यवतमाळ जिल्ह्यातील कुख्यात टोळीला अमरावती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले असून तिघांना अटक करण्यात आली आहे. यातील चौघे अद्यापही फरार आहेत.

सविस्तर असे की, २९ जानेवारीला सुलतानपूर येथील किशोर कोकाटे यांनी त्यांची घराबाहेर बांधून ठेवलेली गाय चोरून नेल्याची तक्रार दिली होती. तळेगाव दशासर पोलिस ठाणे हद्दीत हे गाव येते. नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीतही दोन जनावरे चोरी गेल्याची तक्रार दाखल झाली होती. पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी ही बाब गंभीरतेने घेऊन समांतर तपास करण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक तस्लीम व त्यांचे पथक या भागात गस्त घालत असताना शेख राजीक शेख रज्जाक रा. अलकबीर नगर, यवतमाळ हा त्याच्या साथीदारांसह जनावरे चोरी करीत असून तो सध्या जनावरांची रेकी करण्याकरिता देवगाव चौफुली येथे साथीदारासह उभा असल्याची गोपनीय माहिती मिळाली.त्यावरून त्या ठिकाणावरून पोलिसांनी शेख राजीक शेख रज्जाक वय २८ वर्ष, रा. अलकबीर नगर, यवतमाळ व त्याचा साथीदार अफजल उर्फ सोनू खान अफसर खान पठाण वय २८ वर्ष, रा. रुग्णालय सोसायटी, यवतमाळ या दोघांना अटक



केली. दोघांनी वर नमूद चोर्या आपल्या ५ साथीदारासह केल्याची कबुली दिली. त्यांच्याच सांगण्यावरून जनावरे चोरी केल्यानंतर कटाई करीता गाई कटाई करणार्या यवतमाळ जिल्ह्यातीलच नेर येथील मोहीन खॉ शब्बीर खॉ पठाण यालाही ताब्यात घेण्यात आले. इतर चार जणांचा अद्यापही शोध सुरू आहे.ही कारवाई उप निरीक्षक मोहम्मद तस्लीम, उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर, अमंलदार अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मांगे, दिनेश कनोजीया, गुणवंत शिरसाठ, चेतन गुल्हाने, सागर धापड, रितेश गोस्वामी व चालक हर्षद घुसे यांनी केली.

# परतवाडा मार्गावरील वलगाव ते आसेगाव दरम्यान महामार्गाची चाळणी

## खड्ड्यांमुळे वाहन चालक त्रस्त, उपसरपंच उमेश महिंगे यांचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२टाकरखेडा संभू –** अमरावती वरून मध्य प्रदेश ला जोडणारा रस्ता अमरावती मार्गे परतवाडा धारणी हा कित्येक दिवसापासून अपघाताचे माहेरघर बनलेला आहे, तरीसुद्धा प्रशासनाचे हेतू पुरस्परपणे दुर्लक्ष दिसत आहे ,या रस्त्यावर वलगाव ते आसेगाव पर्यंत भले मोठे खड्डे पडले आहे , परंतु या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्याचा संताप व्यक्त करीत पूर्णानगरचे उपसरपंच उमेश महिंगे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे

अमरावती परतवाडा मार्गावरील वलगाव ते आसेगाव दरम्यान खराब झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीकरिता पूर्णानगरचे उपसरपंच यांनी प्रशासनाला गेल्या दोन वर्षापासून सतत पत्र




व्यवहार करून संबंधित रस्त्यावरचे खड्डेयाबाबत वारंवार सूचना दिल्यावर थातुरमातुर काम करून पुन्हा रस्ता जैसे थे होत ,असल्याबाबत आज पुन्हा अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती यांना प्रत्यक्ष भेटून लवकरात लवकर रस्ता दुरुस्ती करण्याबाबतचे निवेदन देऊन सर्व रस्त्याची व ठेकेदाराच्या चाललेल्या मनमानीची कैफियत मांडली त्याचसोबत च हा मार्ग सात दिवसाच्या आत दुरुस्त न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही उपसरपंचा सह गावकऱ्यांनी दिलेला आहे , सात दिवसात रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन करू असा इशारा पूर्णानगरचे उपसरपंच उमेश महिंगे यांनी दिला आहे.

# प्रेमाची भेट देण्यास रेड वेलवेट हार्ट शेप केकला पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** शहरातील बाजारपेठा विविध भेटवस्तूंनी सजल्या आहेत. तिला किंवा त्याला प्रेमाची भेट देण्यासाठी तरुणाई आतुर झाली आहे. त्यामुळे खरेदीची झुंबड उडाली आहे.'ही गुलाबी हवा, वेड लावी जीवा...' मराठी गीतातील या ओळींप्रमाणेच सध्या सगळीकडचे वातावरण गुलाबी रंगात न्हाऊन निघत आहे. हॉटस्पॉट, शॉपिंग, सिनेमा, पार्टी, डीजे असे प्लॅन्सही आखले जात आहेत. याशिवाय प्रेमाचे सातही दिवशी आपल्या पार्टनरला केक देऊन व्हॅलेंटाइन डे साजरा करतात. यासाठी बाजारात बेकरी तसेच अन्य दुकानांमध्ये विविध प्रकारचे केक विक्रीला आले आहेत. यामध्ये रेड वेलवेट हार्ट शेप असलेला केक तरुणाईला भुरळ घालत आहे.फेब्रुवारी महिना सुरू होताच वेध लागतात ते व्हॅलेंटाइन वीकचे. प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी हा महिना खूप खास असतो.



कारण यानिमित्ताने प्रिय व्यक्तीसमोर आपल्या मनातील प्रेमाची भावना व्यक्त करता येते. तसेच आधीच जोडीदार असेल तर त्याला व्हॅलेंटाइन डेनिमित्ताने चांगले गिफ्ट्स देता येते, फिरायला घेऊन जाता येते. आपल्या प्रेमाच्या नात्यातील आनंद साजरा करता येतो. व्हॅलेंटाइन वीक दरवर्षी ७ फेब्रुवारीपासून सुरू होतो आणि १४ फेब्रुवारीपर्यंत साजरा केला जातो. या व्हॅलेंटाइन वीकचा प्रत्येक दिवस हा खास असतो. प्रिय व्यक्तीसमोर मनातील भावना व्यक्त करायच्या असतील तर रोज डेपासून प्रेम दिवसापर्यंत तरुणाई विविध प्रकारे साजरा करतात.

# आता सर्व शाळांना मिळतील नियमित शिक्षक

## कंत्राटी शिक्षक भरतीचे शासनाचे धोरण अखेर रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** – दहा अथवा दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये डी. एड., बी.एड अर्हताधारक बेरोजगारांची कंत्राटी तत्त्वावर शिक्षक म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. नवीन शासन निर्णयानुसार शिक्षकांच्या रिक्त जागा आता पवित्र पोर्टलद्वारे भरल्या जाणार आहेत.

शासनाच्या या निर्णयाचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने स्वागत केले आहे.

शासनाने वीस अथवा वीसपेक्षा कमी पटाच्या शाळेवर कंत्राटी शिक्षक नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. त्याला शिक्षक पालक संघटना व सामाजिक संघटनांकडून विरोध करण्यात आला होता. त्यामुळे शासनाने पुढे ही योजना १० किंवा १० पेक्षा कमी पटाच्या शाळांसाठी लागू केली होती. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला होता. शिवाय शिक्षकांच्या नियमित नोकरभरतीसाठी प्रश्न निर्माण झाला तसेच शासनाचे हे धोरण म्हणजे नोकरभरतीच्या कंत्राटीकरणाची सुरुवात होती. त्यामुळे याविरोधात शिक्षक संघटनांनी प्रखर विरोध करत रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.शासनाने नुकताच सुधारित शासन निर्णय निर्गमित करून शिक्षकांच्या कंत्राटी भरतीबाबतचा शासन निर्णय अधिक्रमित केला आहे. शासनाच्या या निर्णयाचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचेराज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर,शिक्षक नेते उदय शिंदे,गोकुलदास राऊत,संभाजी रेवाळे,राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर,राज्य महीला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे, जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार,जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे,जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर,जिल्हा कोषाध्यक्ष नंदकीशोर पाटिल,महीला आघाडी प्रमुख सरीता काठोळे, सरचिटणीस विनिता घुलक्षे, कार्याध्यक्ष सुषमा वानखडे ,कोषाध्यक्ष भावना ठाकरे, जिल्हा व तालुका कार्यकारीणी आदींनी स्वागत केले आहे.

# शयनयान बसचा टायर निखळला

# दोन कर्मचारी निलंबित

## परतवाडा आगाराची बस चिखली जवळील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** : परतवाडा येथून पुणेकरिता रवाना झालेल्या शयनयान बसचा टायर चिखलीनजीक निखळला. मात्र, चालकाच्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेला जबाबदार असलेल्या परतवाडा आगारातील यांत्रिकी विभागातील दोन कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई तर एकाला आरोपपत्र बजाविले आहे.परतवाडा आगारातून दररोज पुणेकरिता २८ प्रवासी क्षमता असलेली शयनयान बस रवाना होते. नेहमीप्रमाणे एमएच १४ एलबी २३४४ क्रमांकाची बस ९ फेब्रुवारीला परतवाडा आगारातून सायंकाळी ५ वाजता पुणेकरिता रवाना झाली. शयनयान बस रात्रीच्या सुमारास चिखलीजवळ पोहोचली असता, अचानक मागील चाकांमध्ये यांत्रिक बिघाड झाला. चाकांचा बिघाड होऊन बस अनियंत्रित होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, चालक अजय निमकर व अनिल मांजरे यांनी बस तत्काळ




रस्त्याच्या कडेला थांबवत प्रवाशांना सुखरूप खाली उतरवले. त्यामुळे मोठा अपघात टळला. यावेळी बसमध्ये २५ प्रवाशी प्रवास करीत होते. नादुरुस्त बसची चिखली येथे दुरुस्तीकेली जात आहे. या प्रकरणी परतवाडा आगारातील यांत्रिकी कनिष्ठ कारागीर विलेन जाधव आणि साहायक कारागीर नीलेश भेलाये या दोन कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून निलंबन कारवाई करण्यात आली आहे, तर पाळी प्रमुख अनंत निंबुरकर यांना आरोपपत्र बजाविण्यात आल्याची माहिती परतवाड्याचे आगार व्यवस्थापन जीवन वानखडे यांनी दिली.

# जानेवारीत १९ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती**– जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच असून मागील महिनाभरात तब्बल १९ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपविली. गतवर्षी ऑगस्टमध्ये पावसाचा खंड, काही भागात झालेली अतिवृष्टी यामुळे पिकांचे उत्पादन कमी होण्याची शक्यता असून त्याचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे फास आणखी घट्ट होत चालले आहे. या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना शासनाच्या मदतीची प्रतीक्षा लागली आहे.

जिल्ह्यात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. पिकपद्धती, सिंचनाची सोय, अर्थपुरवठा, शेतमालासाठी बाजारपेठ, जोडधंदे आणि शासकीय मदत या गोष्टींशी शेतकरी जीवन निगडीत असते. महाराष्ट्रात सर्वाधिक



आत्महत्या पश्चिम विदर्भात झालेल्या आहेत आणि हा पट्टा संत्रा, सोयाबीन व कापूस उत्पादकांचा आहे. अल्प सिंचना मुळे शेतकऱ्यांवरची संकटे वाढतच आहेत. आतापर्यंत ज्यांनी आत्महत्या केल्या, ते शेतकरी बहुतेक कोरडवाहूचे कास्तकार होते. ते कर्जबाजारीही होते. राष्ट्रीय बँका शेतकऱ्यांना कर्जाऊ रक्कम सहज देत नाहीत. परिणामी, शेतकरी खासगी सावकाराची पायरी चढतो. अशातच तो या अवाढव्य कर्जाच्या बोझ्याखाली दबतो आणि अशा शेतकऱ्याला मरण जवळ करण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाहीं. या कारणांमुळे शेतकरी आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यात जानेवारी महिन्यात १९ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपविली आहे.या सर्व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या आर्थिक मदतीकरिता प्रशासनाकडे प्रस्ताव दाखल झाले आहेत. वाची पडताळणी सुरू असून यातील शासनाच्या निकषानुसार यामध्ये किती प्रस्ताव पात्र होतात आणि किती फेटाळले जातात, याकडे लक्ष लागले आहे.

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीची प्रतीक्षा

# सात अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षकपदी बढती

## शहरातील चार, ग्रामीणमधील तिघांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती**



राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यांत कार्यरत ४९६ पोलीस अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. त्या पदोन्नतीप्राप्त पोलीस उपनिरीक्षकांना पदस्थापना देणारा आदेश सोमवार, १० फेब्रुवारी रोजी पोलीस महासंचालक कार्यालयाकडून काढण्यात आला. त्यात जिल्ह्यातील एकूण सात पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्यात अमरावती शहर आयुक्तालयात कार्यरत चार व ग्रामीणमधील तिघांचा समावेशआहे.

अमरावती शहरमधील प्रेमराव रामकृष्ण वानखडे, रंगराव हुनसिंग जाधव, विकास जयराम रायबोले व विजय धुर्वे यांचा समावेश आहे. यातील प्रेमराव वानखडे व विकास रायबोले यांची पदस्थापना अमरावती परिक्षेत्रात करण्यात आली आहे. तर रंगराव जाधव हे अमरावती शहर आयुक्तालयातच सेवा देतील. तर, अमरावती शहरमधील विजय धुर्वे यांना पदोन्नतीवर महाराष्ट्र सुरक्षा पथकला पाठविण्यात आले आहे. राज्यभरातील ४९६ पोलीस अंमलदारांची पोलीस उपनिरीक्षक गट ब (अराजपत्रित) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे. अमरावती ग्रामीणमध्ये कार्यरत मुलचंद भांबुरकर व ज्ञानेश्वर सिलाम यांना अमरावती परिक्षेत्रातच पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. तर, नरेंद्र वानखडे अकोल्याच्या पोलीस प्रशिक्षण केंद्रात पदस्थपना देण्यात आली आहे

# उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी जागा हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करा

## आ. सुलभा खोडके यांनी घेतला महावितरणचा आढावा

### शासकीय अभियांत्रिकी परिसरात लवकरच ३३ केव्ही उपकेंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** – आगामी उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता नागरिकांना वीज पुरवठ्यासंदर्भात कोणत्याही अडचणी येऊ नये. त्या दृष्टिकोनातून शहरात नवीन ३३ केव्ही उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी जागा हस्तांतरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात यावी. अशा सूचना आ. सुलभा खोडके यांच्या वतीने बैठकीदरम्यान दिल्या.आ.सुलभा खोडके



यांनीमहावितरण संबंधीच्या विविध कामांचा आढावा घेतला. शहरातील ३३/११ नवसारी उपकेंद्र हे अतिभारीत झाल्यामुळे ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा देण्यासाठी नवीन उपकेंद्र कार्यन्वित करणे गरजेचे आहे. नवीन उपकेंद्र शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये प्रस्तावित आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरात ३३ केव्ही उपकेंद्र सुरु करण्याचा मार्ग सुकर झाला आहे. तसेच ट्रान्सपोर्ट नगर व राहाटगांव आयटीआय जवळ प्रस्थापित असलेल्या नवीन ३३/११ केव्ही उपकें द्राबाबत जागा अजूनही अप्राप्त आहे. त्यामुळे सदर जागा महानगर पालीकेकडून हस्तांतरित करण्याबाबतची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याची सूचना देखील आ. सुलभा खोडके यांनी महावितरण प्रशासनाला केली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके, महावितरणचे कार्यकारी अभियंता शहर विभाग संजय सराटे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता उपविभाग प्रशांत फुटाणे, सुधीर वानखडे, बिपीन श्रीराव, यश खोडके आदी उपस्थित होते.

# समाजकल्याण विभागाची विविध पदांसाठी ४ मार्चपासून भरती प्रक्रिया

## २५ फेब्रुवारीपासून ऑनलाइन प्रवेश पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** :समाज कल्याण विभागाचे विविध पदांसाठी भरती प्रक्रिया ऑनलाइन परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. सदर परीक्षांना ४ मार्चपासून सुरुवात होणार असून २५ फेब्रुवारीपासून उमेदवारांना ऑनलाइन प्रवेश पत्र संकेत स्थळावर उपलब्ध करूनदेण्यात येणार आहे.समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील वर्ग–३ संवर्गातील विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविली जात आहे. ही भरती प्रक्रिया संदर्भात अर्जदार यांच्यासाठी महत्त्वाची सूचना असून सदर ऑनलाइन परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. सदर कॉम्प्युटरबेस ऑनलाइन परीक्षा ही आगामी ४ ते १९ मार्च २०२५ दरम्यान विविध सत्रांमध्ये घेण्यात येणार आहे. वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक, गृहपाल, अधीक्षक, समाज कल्याण निरीक्षक, उच्च श्रेणी लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक व लघु टंकलेखक या संवर्गासाठी ही ऑनलाइन परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. उमेद्वारांना २५ फेब्रुवारीपासून प्रवेश पत्र ऑनलाइन पद्धतीने संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# सीईओंना भेटायचं; क्यूआर कोड स्कॅन कराअभ्यागत, नागरिकांच्या भेटीकरिता झेडपीत डिजिटल सुविधा

## भेटीचे वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** :जिल्ह्यातील सर्वच विभाग प्रमुखांनी नागरिकांच्या भेटीचे वेळापत्रक जाहीर करण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी दिले होते. जिल्हा परिषदेत याची अंमलबजावणी सुरू कारित अभ्यागत, नागरिकांना सीईओंना भेटायचे असल्यास क्यूआर कोड स्कैन करून नोंदणीची सुविधा उपलब्धकरून देण्यात आली आहे. याशिवाय भेटण्याचे वेळापत्रक देखील जाहीर करण्यात आले आहे.नागरिकांशी सबंधित असलेल्या सर्वच विभागप्रमुखांना नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण करण्याची जबाबदारी आहे. परंतू बहुतांश विभागात विभाग प्रमुखच भेटत



नसल्याच्या तक्रारी पालकमंत्र्यांकडे प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे नागरिकांना भेटण्याचीवेळ निश्चित करुन तसे वेव्यापत्रक जाहीर करणे गरजेचे आहे. जिल्हा परिषदेत सीईओंनी त्यांना भेटण्याकरिता यापुर्वीच वेळापत्रक जाहीर केले होते. परंतु यामध्ये आता डिजिटलनागरिकांकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे सर्वच विभाग ई कार्यालयाशी सलग्न असल्याने सीईओंकडे फाईल्सचा प्रवास बंद झाला आहे. केवळ ई फाईल्सलाच सीईओंकडून मान्यता दिली जात आहे. आता भेटीकरिता देखील डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याकरिता सीईओंच्या दालणासमोर स्कैनर लावण्यात आले आहे. हे स्कैनल मोबाईलवर स्कैन करुन भेटीकरिता नोंदणी केली करता येणार आहे.सीईओं भेटण्याकरिता सोमवार पुर्ण दिवस, मंगळवार व गुरूवार सकाळी १०.३० ते १.३० दरम्यान, या व्यतिरिक्त बैठका नसल्यास देखील सोईओना भेटता येणार आहे.

# नेरपिंगळाई शेतशिवारातून पाण्याच्या २ मोटारी चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२मोर्शी** : तालुक्यातील नेरपिंगळाई शेत शिवरातून पाण्याच्या ३ मोटारी चोरुन नेल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.तालुक्यातील नेरपिंगळाई शेत शिवरातून गेल्या अनेक दिवसंपासून शेती साहित्य चोरीचा सपाटा चोरट्यांनी चालविला आहे.

मागील महिन्यात काही शेतकऱ्यांचे स्प्रिकरचे पितळी नोजल चोरट्यांनी लंपास केले होते. त्यांना शोधण्यास पोलिस अपयशी ठरली असतानाच सोमवारी रात्री विजय नालट यांच्या शेतातून ३ पाण्याची मोटर व ७० फूट केबल व एक दिवसापूर्वी प्रफुल कनेर यांचे शेतातून ५ एचपीची मोटरसह ७० फूट केबल चोरून नेला. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे शिरखेड पोलीसांवर चोरट्यांचा शोध लावण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार यांचे मार्गदरशनाखाली पिएसआय राठोड व बीट जमादार मनोज कळस्कर करीत आहे.

# अचलपूर बाजार समितीमध्ये अशुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

## शेतकऱ्यांच्या आरोग्यावर परिणामाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती** – स्थानिक बाजार समितीमध्ये अशुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने माथाडी कामगारांसह शेतकऱ्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने मंगळवारी ३० ते ४० माथाडी कामगारांनी बाजार समिती कार्यालयात जाऊन अशुद्ध पाण्याचा नमुना दाखवित प्रशासनाला अवगत केले.




बाजार समितीमध्ये ४०० नोंदणीकृत कामगार दररोज हमलीची कामे करतात. तर हजारो शेतकरी साप्ताहिक आणि शासकीय सुटीचे दिवस वगळता कृषिमाल विकण्यासाठी नियमित बाजार समितीमध्ये येत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांसह हमाली कामे करणाऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी बाजार समितीमध्ये असलेल्या बोअरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. सदर बोअर स्थानिक शेतकरी भवनाजवळ असून त्याचे पाणी टाकीत सोडले जाते आणि येथून नळाद्वारे पिण्याचे पाणी हमालांसह शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होते.मात्र, नळातून येणारे पाणी अशुद्ध असल्याची ओरड माथाडी कामगारांनी केली असून शुद्ध पेयजल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी मेहबूबभाई यांनी बाजार समितीचे सहसचिव मंगेश भेटाळू यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली आहे. याप्रसंगी माथाडी कामगार मोठ्या संख्येत उपस्थित होते.

Vidarbha Prajasattak

# कॉपीसाठी मदत करणाऱ्या शिक्षकांना करणार बडतर्फ

## केंद्राची मान्यता रद्द करण्याची मुख्यमंत्री फडणवीसांची सूचना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे पाऊल उचललं आहे. १२ वी आणि १०वी च्या परीक्षेदरम्यान कॉपी रोखण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान कठोरपणे राबवण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर आता परीक्षेत कॉपीसाठी मदत करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

राज्यातील दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये सामूहिक कॉपीच्या घटनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांना दिले आहेत. अशा केंद्रांची मान्यता कायमस्वरूपी रद्द करावी तसेच कॉपीस मदत करणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना थेट सेवेतून बडतर्फ करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिले आहेत. यावेळी परीक्षेच्या पारदर्शकतेसाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगण्यात आलं आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या सूचना

परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेशबंदी तसेच पुरेसा बंदोबस्त ठेवावा. विद्यार्थ्यांना कोणतेही कॉपी साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगण्यास मनाई. भरारी पथकाद्वारे कडक निरीक्षण करण्यात यावे. संवेदनशील केंद्रांवर ड्रोन व व्हिडिओ कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवावी. जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रावर विशेष बैठ्या पथकाची नियुक्ती करावी. प्रत्येक तालुक्यात विशेष प्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी

# ईव्हिएम मधून कुठलाही डेटा डिलीट करू नका सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

देशातील कुठल्याही निवडणुकीनंतर एतच् चा मुद्दा उपस्थित केला जातो. अशातच, ईव्हीएमच्या पडताळणीसाठी धोरण आखण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी(११ फेब्रुवारी) सुनावणी झाली. या याचिकेत निवडणूक आयोगाने ईव्हीएमच्या मेमरी/ मायक्रोकंट्रोलरची चाचणी आणि पडताळणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची मागणी केली आहे. त्यावर सुनावणी करत न्यायालयाने निवडणूक आयोगाकडून (एउख) उत्तर मागितले असून, सध्या एतच् मधून कोणताही डेटा हटवू नका किंवा कोणताही डेटा रि-



लोड करू नका, असे स्पष्ट आदेश दिले आहेत.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स च्या या याचिकेत, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला ईव्हीएमची मेमरी तपासण्यासाठी स्पष्ट प्रोटोकॉल तयार करण्यास सांगावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होणार असल्याचे सांगितले आहे.

एडीआरच्या याचिकेत म्हटले आहे की, निवडणूक आयोगाच्या सध्याच्या स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजरमध्ये (एसओपी) फक्त ईव्हीएम आणि मॉक पोलच्या मूलभूत तपासणीच्या सूचना आहेत. जळालेल्या मेमरीच्या तपासाबाबत आयोगाने अद्याप प्रोटोकॉल तयार केलेला नाही. ईव्हीएमचे चारही भाग, कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हीव्हीपीएटी आणि चिन्ह लोडिंग युनिटचे मायक्रोकंट्रोलर तपासण्यासाठी प्रोटोकॉल लागू करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी याचिकाकर्त्यांने केली आहे.

या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयाचा हवाला दिला आहे. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घेण्याची जुनी पद्धत पूर्ववत करण्यास नकार दिला होता. याशिवाय सर्व ततझ-ढ स्लिप मोजण्याची मागणीही फेटाळण्यात आली. परंतु चांगल्या पारदर्शकतेसाठी न्यायालयाने निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर १ आठवड्याच्या आत ईव्हीएमची जळालेली मेमरी तपासण्याची परवानगी दिली होती.

२६ मार्च २०२४ रोजी दिलेल्या या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाचे उमेदवार निकाल जाहीर झाल्यापासून आठवडाभरात पुन्हा पडताळणीची मागणी करू शकतात. अशा परिस्थितीत, अभियंत्यांची टीम कोणत्याही ५ मायक्रो कंट्रोलरची बर्न मेमरी तपासेल. या तपासणीचा खर्च उमेदवाराला करावा लागणार आहे. अनियमितता सिद्ध झाल्यास उमेदवाराला पैसे परत मिळतील.

# शिक्षक बँकेतही विरोधी संचालकांना सर्वोच्च दिलासा सत्ताधाऱ्यांना धक्का

## परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेतील विरोधी पाच संचालकांवर सत्ताधारी गटाकडून आणण्यात आलेल्या अविश्वासाच्या प्रस्तावाला उच्च न्यायालयाने वैध ठरविले होते. मात्र त्या पाचही संचालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर न्यायालयाने स्टेटसकोचे आदेश दिले आहे. त्यामुळे तूर्तास तरी शिक्षक बँकेतील पाच विरोधी संचालकांवरील गंडांतर टळले आहे. विशेष म्हणजे, कालच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्ताधारी गटातील पाच संचालकांवर अविश्वास प्रस्तावावरसुद्धा स्टेटसको दिला आहे.

न्यायालयाने जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेत सत्ताधारी गटाकडे १६, तर विरोधी गटाकडे पाच संचालक आहेत. मात्र बँकेच्या प्रत्येक सभेत विरोधी संचालकांकडून आडकाठी केली जात असल्याचा आरोप करीत सत्ताधारी गटाकडून चार जानेवारी २०२४ रोजी प्रभाकर झोड, संजय नागे, मंगेश खेरडे, मनोज चौरफगार व गौरव काळे या पाच संचालकांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव पारित केला. त्यानंतर विरोधी संचालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाकडून २७जानेवारी २०२५ ला हा अविश्वास प्रस्ताव वैध ठरविण्यात आला होता. त्यानंतर पाचही माजी संचालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. १० फेब्रुवारीला न्यायालयाने राज्य शासन तसेच विभागीय सहनिबंधकांना नोटीस बजावित पुढील तारखेपर्यंत सदर प्रकरणात कुठलीही कार्यवाही करता येणार नसल्याचे (स्टेटसको) आदेश पारित केले. त्यामुळे आता पुढे न्यायालयाकडून काय निर्णय दिला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तूर्तास तरी शिक्षक बँकेतील सत्ताधारी गटाला जोरदार धक्का बसला आहे. यासंदर्भात बँकेचे अध्यक्ष गोकुलदास राऊत हे बाहेर गावी असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.




न्यायव्यवस्थेवर आमचा विश्वास असून सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली आहे. आमचा विश्वास आहे की आम्हाला न्याय जरूर मिळणार.
**मंगेश खेरडे, माजी संचालक, शिक्षक बँक.**

# दाभाडा ग्रा.पं.चे सरपंच-उपसरपंचासह तीन सदस्य अपात्र; अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धामणगाव रेल्वे:**

येथील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या दाभाडा ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या मालमत्ता व पाणीपट्टी कर थकीत ठेवत विलंबाने चुकीच्या पध्दतीने भरणा केल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट झाल्याने संजय पनपालिया यांच्या तक्रारीवरून दाखल करण्यात आलेल्या अपिल निकाली काढत अप्पर जिल्हाधिकारी यांनी सरपंच मुकुंद माहोरे, उपसरपंचव्स्नेहल राऊत यांच्यासह तीन ग्रामपंचायत सदस्यांना अपात्र घोषित केले.

धामणगाव रेल्वे पंचायतसमिती अंतर्गत येणाऱ्या दाभाडव येथील ग्रामपंचायत सदस्य मुकुंद बाबाराव माहोरे, किरण राजू थुल, स्नेहल प्रमोद राऊत, प्रतिभा सुरेश ठाकरे, संतोष हरीभाऊ ठाकरे यांच्या विरोधात संजय पनपालिया यांनी तक्रार दिली की, २०२०-२१ च्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदर सदस्यांनी मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा वारंवार मागणी करूनही केला नाही. याबाबत तक्रारदाराने ग्रामपंचायतीला सतत माहिती मागीतली असता विलंबाने किंवा चुकीच्या पध्दतीने एकाच दिवशी थकीत रकमा भरल्याचे पावत्या खोट्या तारखा टाकून भरल्या गेल्याचा दाखविण्याचा प्रयत्न केला गेला. याप्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी यांनी सर्व चौकशी अहवाल व इतर प्रशासकीय दस्तावेजांची तपासणी केल्यानंतर मालमत्ता व पाणीपट्ठी कर थकीत ठेवणे भोवले.थकीत कराचा भरणा विविध मुदतीत भरणा न करता विलंबाने केल्याची बाब स्पष्ट झाल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ ची कलम १४ (१) (ह) तरतूदीनुसार सदर सदस्यांना अपात्र करण्याचा आदेश अप्पर जिल्हाधिकारी सूरज वाघमारे यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाला आहे.

# नागरिकांना दिलासा: घरकुल योजनेतील घरं आता शेतातही बांधता येणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

प्रधानमंत्री आवास योजना आणि राज्य सरकारच्या आवास योजनेतर्गत अनेक लाभार्थ्यांना हक्काची परे मंजूर ती या झाली आहेलः मात्र जागेअभावी या घरकुलांच्या बांधकामास विलंब होत आहे. आता या समस्येवर उपाय म्हणून लाभार्थ्यांना स्वताच्या मालकीच्च्या शेत जमिनीवरही घरकुल बांधण्याची परवानगी देण्यात आली आहे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना तातडीने अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत.

प्रत्येक नागरिकाला हक्काचे घर मिळावे, यासाठी प्रधानमंत्री आवास योजना आणि ग्रामीण तसेच राज्य आवास योजनेंतर्गतघरकुल मंजूर केले जातात, लाभार्थ्यांकडे स्वताच्या मालकीची जागा नसल्याने त्यांना घरकुल बांधता येत नव्हते. ही समस्या लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांची बैठक घेऊनपरिस्थितीचा आढावा घेतला यावेळी अनेक लाभार्थ्यांकडे आगेअभावी घरकुलाचे काम प्रलंबित असल्याचे समोर आले. तसेचमहाराष्ट्र महसूल जमीन अधिनियम१९६६ च्या कलम ४१ नुसार लाभार्थ्यांना त्यांच्या स्वताच्या शेतजमिनीवर ५०० स्क्वेअर फूट क्षेत्रात घरकुल बांधण्याची परवानगी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे जागेअभावी घरकुलाचे स्वप्न अपूर्ण राहिलेल्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

नियम काय आहे?लाभार्थ्यांकडे स्वताच्या नावे शेतीचा सात-बारा उतारा असणे आवश्यक आहे. जे लाभार्थी त्यांच्या शेतात घरकुल बांधण्यास इच्छुक आहेत, त्यांनाच ही परवानगी दिली जाईल. घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर संबंधित तलाठ्याहारे सात-बाऱ्यावर त्याची नोंद घेण्यात येईल. त्यानंतर गाव नमुना ८ मध्ये शासन घरकुल म्हणून नोंद करण्याची जबाबदारी गटविकास अधिकाऱ्यांवर असेल.

# कालबाह्य एसटीबसचा मनस्ताप : प्रवाश्यांना बसतोय फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२पथ्रोट**

एसटी महामंडळ अंतर्गत धावणाऱ्या एसटीबस या कालबाह्य झाल्यानंतरही सेवा देत असल्याने त्या भर रस्त्यात वारंवार बंद पडून चालक, वाहकासह प्रवाशांना प्रचंड मनस्ताप देत आहेत. महामंडळाच्या ताफ्यात नव्या बसगाड्या येणार असल्याची शासनाकडून घोषणा जरी झाली असली तरी मात्र या अत्यावश्यक सेवेकडे त्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे परिणाम कर्मचाऱ्यांना भोगावे लागत आहे.

मूर्तिजापूर आगाराची एमएच ४०/ एन ९००५ या क्रमांकाची परतवाडा-



मूर्तिजापूर फेरी करणारी एसटीबस पावणे बारा वाजताच्या दरम्यान पथ्रोट बसस्टॅन्डवर पोहोचली. समोरच्या प्रवासाला निघताना ६१ प्रवासी त्यामध्ये प्रवास करण्यासाठी उपस्थित होते. २०० मीटर समोर गेल्यावर सदर बसचा वाटरपंप निकामी होऊन फॅन बेल्ट तुटल्याचे चालकाच्या लक्षात आले. मग त्यांनी बस रस्त्याच्या कडेला उभी करून त्यातील सर्व प्रवाशांना दुसऱ्या बसगाडीमध्ये बसवून दिले.याची माहिती मूर्तिजापूर येथील बस आगाराला देण्यात आली होती; परंतु वारंवार अशा भंगार एसटीबस गाड्यांचा सामना करताना सर्वांनाच नाकीनऊ आले आहे.

# गुडमॉर्निंग पथकाची गांधीगिरी; ६ तालुक्यांतील पथके सक्रिय आतापर्यंत ४५ गावांत कारवाई, १७८ ग्रामस्थांना दिले पुष्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

उघड्यावर शौचास करणाऱ्या जिल्ह्यातील १७८ नागरिकांना समज, पुष्प देऊन गुडमॉर्निंग पथकाने गांधीगिरी दाखवली आहे. १४ पैकी ६ तालुक्यातील पथके सक्रिय झाली असून, आतापर्यंत ४५ गावांमध्ये ही कारवाई केली आहे.

जिल्ह्यातील काही गावांमध्ये अजूनही काही नागरिक उघड्यावर शौचास बसून गावाच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करत आहेत, अशा तक्रारी प्राप्त होताच अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी याची दखल घेतजिल्ह्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना पत्राद्वारे उघड्यावर शौचास जात असलेल्या ग्रामस्थांवर स्थानिक दक्षता समितीमार्फत ७जानेवारीपासून कारवाई



करण्याचे सक्त निर्देश दिले होते. त्यानुसार उघड्यावर शौचास बसणाऱ्या ग्रामस्थांवर प्रथम गांधीगिरी आणि नंतर दंडात्मक कारवाईचे आदेश दिले. अशातच जिल्ह्यातील १४ पैकी सहा तालुक्यांतील गुड मॉर्निंग पथक सक्रिय झाले आहे.याअंतर्गत चांदूर रेल्वे, मोर्शी, चांदूर बाजार, तिवसा, भातुकली, नांदगाव खंडेश्वर या ६ तालुक्यातील ४५ गावात गुडमॉर्निंग पथकाने १७८ ग्रामस्थांना उघड्यावर शौचास करताना पकडले. त्यांना समज देवून पुष्प देऊन सोडण्यात आले. दरम्यान फेब्रुवारी आणि मार्चमध्ये मात्र जे ग्रामस्थ उघड्यावर शौचास जातील त्यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील तरतुदी तसेच मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ११५ ते ११७अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे अमरावती जिल्हा परिषद प्रशासनाने ठरवले आहे.दरम्यान ग्रामस्तरावर हागणदारीमुक्त गाव निगराणी समिती तथा दक्षता समिती स्थापन केली असून, या समितीमार्फत गुड मॉर्निंग उपक्रम राबवण्यात येत आहे, अशी माहिती कळवण्यात आली आहे.

# नियम न पाळणाऱ्या ३९ रुग्णालयांना मनपाची नोटीस नियमांची पूर्तता ३० दिवसात करा; अन्यथा कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अकोला**

महापालिका क्षेत्रातील खासगी रुग्णालयातील तांत्रिक बाबी तपासणीची मोहीम महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने हाती घेतली असून ३६१ रुग्णालयांपैकी ३९ रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याचे आढळून आले. याप्रकरणी संबंधितांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांना वैद्यकीय आरोग्य विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली असून ३० दिवसांच्या नियमांची पूर्तता करण्याचे सांगण्यात आले आहे.

या मोहिमेत रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणी झाली आहे का? याची तपासणी करण्यात आली. तसेच रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी करण्यात आली. रुग्णालयाकडील अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि जैववैद्यकीय कच-याच्या विल्हेवाटीबद्दल माहिती घेण्यात आली. तसेच रुग्ण हक्क संहिता, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र यांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेसाठी १० पथके नियुक्त करण्यात आली होती. नोडल अधिकारी म्हणून मेडिकल ऑफिसर व प्रत्येक पथकात आठ ते नऊ जणांचा समावेश होता.

**नियमांचे पालन होत नसल्याचे दिसून आले**

उपचारांचे दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, रुग्ण हक्क संहिता नसणे यासह इतरनियमांचे पालन होत नसल्याचे काही ठिकाणी निदर्शनास आले.

# खामगावमध्ये थरार, माय लेकींवर चाकूने हल्ला! एकीचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ खामगाव**



क्षुल्लक कारणावरून माथेफिरू युवकाने तिघा मायलेकीवर चाकूने हल्ला केला. यात एका युवतीचा मृत्यू झाला असून दोघींची प्रकृती गंभीर आहे. त्या रुग्णालयात मृत्युशी झुंज देत आहे. यामुळे खामगाव शहर हादरले असून नागरिकांत भीती निर्माण झाली आहे.

खामगाव शहरातील बोबडे कॉलनीमध्ये मंगळवारी रात्री उशिरा ही घटना घडली. प्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी बुधवारी, बारा फेब्रुवारीच्या उत्तररात्री तीन वाजताच्या सुमारास गुन्हा दाखल केला आहे. प्रशांत उर्फ गोलू चरणदास सारसर (वय पंचवीस, राहणार बोबडे कॉलनी, खामगाव, जिल्हा बुलढाणा ) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खामगाव शहर पोलिसांनी घटनेनंतर तपास चक्रे फिरवून आरोपी गोलू याला बुधवारी उत्तररात्री अटक केली आहे.प्रकरणी जखमी कुमारी हर्षा सुरेश पटे (वय सोळा, बोबडे कॉलनी) हिने घटनेची तक्रार दिली. यानुसार बोबडे कॉलनीमधील पटे यांच्या घरासमोर रस्त्याचे काम सुरु आहे. काल मंगळवारी रात्री हर्षा हिची आई आणि मोठी बहीण संध्या पटे या घरासमोर बसल्या होत्या. यावेळी आरोपी गोलू याने रस्त्याचे बांधकाम करायचे नाही असे सांगत वाद घातला. तसेच चाकूने सौ. पटे यांच्या पोटात वार केले. यामुळे हर्षा आणि संध्या सोडवायला गेल्या असत्या त्याने त्यांच्यावरही चाकूने हल्ला केला. संध्या हिच्या पोटात चाकूने वार केल्यावरही त्याचे समाधान झाले नाही. त्याने तिला फरफटत नेत तिच्या पोटात चाकूने सपासप वार केले. यानंतर आरडा ओरड झाल्याने आरोपी फरार झाला. दरम्यान घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. संध्या पटे हिला अत्यावस्थेत अकोला येथे उपचारासाठी हलविण्यात आले. तिथे उपचारादरम्यान संध्याचा मृत्यू ओढावला.

# डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात रौप्य महोत्सवी वादविवाद स्पर्धा

## २१ फेब्रुवारी रोजी होणार वैचारिक मंथन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**



श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती येथे २१ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या वादविवाद स्पर्धेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे.गेल्या पंचवीस वर्षापासून सतत आयोजित केल्या जाणारी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचा यावर्षीचा विषय आजच्या आधुनिक युगामध्ये वृद्धाश्रम व्यवस्था ही कुटुंब व्यवस्थेला पर्याय असू शकते हा आहे. विजेत्या स्पर्धकांना स्व. सुधाकरराव काळे स्मृती पित्यर्थ अकरा हजार रुपये रोख व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती चषक देऊन प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. द्वितीय पारितोषिक स्व प्रभाकर पांडे स्मृती पित्यर्थ सात हजार रुपये रोख व स्व. पंजाबराव देशमुख स्मृती चषक तर तृतीय पारितोषिक राजेंद्र सिंह बयस स्मृति प्रित्यर्थ पाच हजार रुपये रोख व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक स्व. विनायकराव ठाकरे स्मृती प्रित्यर्थ रोख ३००१, द्वितीय पारितोषिक स्व. निर्मलाताई भोगे स्मृती प्रित्यर्थ २००१ रोख,आणि तर तृतीय पारितोषिक स्व.देविदासजी पांडे स्मृती प्रित्यर्थ १००१ आणि स्मृती चिन्ह या स्वरूपात स्पर्धकांना देण्यात येईल. डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे २१ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता स्पर्धेला सुरुवात होणार असून या स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आयोजन समितीचे प्रा.डॉ. रामटेके ९४२१८२२६२२, प्रा.ठाकरे ९४०४१०२७९१, प्रा .डॉ.लोखंडे ९८५०५८८४६६, प्रा .डॉ.काळे ९६५७००८५००, प्रफुल्ल घवळे ९३७०१०४२९३ यांच्याशी संपर्क करावा असे आयोजकाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# दिडशे दिव्यांगासह राज्यमंत्र्यांनी घेतले ‘श्रीं’ चे दर्शन! ‘सहकुटुंब’ महाप्रसादाचा आस्वाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ शेगाव**



राज्याचे गृह(ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री पंकज भोयर हे मंगळवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी शेगावला संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. दुपारी ते सपत्नीक संत गजानन महाराज यांच्या मंदिरात पोहचले. यावेळी त्यांच्यासोबत वर्धा जिल्ह्यातून आलेल्या दीडशे दिव्यांग होते .या सर्वांनी दर्शन घेतले.

श्री गजानन महाराज संस्थानच्या सेवा कार्याची माहिती घेतली. त्यानंतर आपल्या परिवार व वर्ध्याहून आलेल्या दीडशे दिव्यांग बांधवांसोबत महाप्रसादाचा लाभही घेतला.एरवी मंत्र्यांच्या भोजना ची बडदास्त शासकीय विश्रामगृह वा सुसज्ज हॉटेलमध्ये केली जाते. मात्र शाही जेवण घेण्याचे टाळून मंत्र्यांनी संस्थानच्या महाप्रसादालय मध्ये इतर हजारो भाविका प्रमाणे मोफत प्रसादचा आस्वाद घेतला.यावेळी गजानन महाराज संस्थांनाच्या वतीने त्यांचे यथोचित सपत्नीक स्वागत सत्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या सोबत जिल्हा निबंधक (सहकारी संस्था )नानासाहेब चव्हाण , आशिष वाघ, उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद बुलढाणा, अनिल देवकर, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) बुलढाणा, मंगेश भोरसे, सहायक कार्यक्रम अधिकारी, शेगाव पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी श्रद्धा वायदंडे आदींची उपस्थिती होती.

# भुईघर मंदिरात : करजगाव येथे तीनशे वर्षांपूर्वीचा अय्याबुवा मठ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ करजगाव**

एखाद्या गावात चौकात गप्पा मारण्यासाठी जसा ओटा असतो, अगदी तसाच ओटा चांदूरबाजार तालुक्यात असणाऱ्या करजगाव या गावात आहे. या ओट्यावर मात्र ग्रामस्थांच्या गप्पागोष्टी रंगत नाहीत. तर या ओट्यावर महादेवाची छोटीशी पिंड स्थापन करून त्यावर त्रिशूल उभारण्यात आला, असं प्रथमदर्शनी वाटतं. हे ठिकाण अय्यबुवांचं मठ म्हणून ओळखलं जातं. प्रत्यक्षात हे ठिकाण कसं आहे

सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असणाऱ्या करजगावात अतिशय लहान रस्ते आहेत. गावातील या रस्त्यावरून जाताना एका ठिकाणी अय्याबुवाचं मठ अशी पाटी लागलेलं ठिकाण दिसतं. या ठिकाणी चार पायऱ्या चढल्यावर चौकोनी आकाराच्या ओट्यावर महादेवाची पिंड आहे. या पिंडीला लागूनच ओट्यावरून खाली जमिनीत उतरण्याचा रस्ता आहे. भुयारात पायऱ्यांद्वारे खाली उतरल्यावर खाली आणखी मोठा भुयार दिसते. या ठिकाणी संपूर्ण बांधकाम हे चुन्यामध्ये केलेलं आढळतं. अगदी छोट्याशा दारांमधून वाकत जाऊन आतमध्ये प्रवेश केल्यावर अतिशय सुंदर अशा शिवलिंगाचं दर्शन घडतं. शिवलिंग असलेल भुयार हे अतिशयं थंड असून त्या ठिकाणी सतत पाणी असतं. शिवलिंगाच्या भुयाराजवळच खोल अशी छोटी विहीर आहे. शिवलिंगाचं दर्शन घेतल्यावर शिवलिंगाला प्रदक्षिणा घालताना गणपतीच्या अतिशय सुंदर अशा मूर्तीचं दर्शन घडतं. त्यासोबतच नागदेवता, बजरंग बली आणि या गावातील ग्रामदेवतेचं दर्शन भुयाराखाली होतं. ज्या ठिकाणावरून आपण खाली उतरतो, त्याच ठिकाणी आतमधून वेगळ्या मार्गानं पोहोचल्यावर चढून बाहेर निघावं लागतं.

करजगाव येथील हे भुयारी मंदिर तीनशे वर्ष जुनं असल्याची माहिती गावतील पोलीस पाटील अश्विन मेहरे यांनी ईटीव्ही भारतशी बोलताना दिली. भुईघर मंदिरात काही भुयारी मार्ग आहेत. नवखा व्यक्ती या भुयारात फिरताना कुठल्याही मार्गानं गेल्यावर एकाच मंदिरात पोहोचतो, असं अनेकदा होतं. या ठिकाणची माहिती असणाऱ्या व्यक्तीसोबतच बाहेरून येणाऱ्या व्यक्तींना मंदिरातील देवांचं दर्शन घेणं सोयीचं असतं. फारपूर्वी या भुईघर मंदिरातून एक भुयार हे चौरागड या ठिकाणी असणाऱ्या मोठ्या महादेवाच्या स्थानावर निघत असे, अशी आख्यायिका सांगण्यात असल्याचं अश्विन कुमार मेहरे यांनी सांगितलं.

# अखेर ब्राम्हणवाडा येथील अनधिकृत निर्माणकार्याला स्थगिती

## माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे यांचा पुढाकार : धुर्वे यांचे उपोषण सुटले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**



अमरावती पंचायत समितींतर्गत येणाऱ्या ब्राम्हणवाडा गोविंदपूर येथील शासकीय जमिनीवर सुरू असलेल्या सीम्स जुपिटर प्रायव्हेट लिमिटेड मुंबई या कंपनीच्या अनधिकृत निर्माण कामाला तहसीलदारांच्या आदेशाने स्थगिती देण्यात आली आहे. या कामाच्याविरोधात बिरसा ब्रिगेडचे उपाध्यक्ष मनीष हरिदास धुर्वे यांच्यासह ग्रामस्थानी उपोषण सुरू केले होते. माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर तसेच खासदार बळवंत वानखडे यांनी या गंभीर विषयाचा पाठपुरावा केल्यानंतर प्रशासनाकडून निर्माण कार्याला स्थगिती देण्यात आली. यासोबतच मनीष धुर्वे यांनी आपले उपोषण सुद्धा मागे घेतले आहे.ब्राम्हणवाडा गोविंदपूर ग्रामपंचायतीने २४ ऑगस्ट २०२३ रोजी एक ठराव घेऊन गट क्रमांक २४७ मध्ये सीम्स जुपिटर प्रा. ली. कंपनीला १४.२४ हेक्टर जागेवर प्रत्येकी २० बाय २० चौरस मीटर जागेवर तीन मनोरे उभारणीसाठी ही जागा ३० वर्षांकरिता भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र ही जागा शासकीय असल्याने हे काम अनधिकृत असल्याचा आरोप करित मनीष धुर्वे यांनी उपोषण सुरू केले. माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांनी ही बाब प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतर तहसीलदारांच्या निर्देशानुसार गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिवांना नोटीस जारी करित हे काम थांबविण्याचे आदेश दिले आहे. त्यानंतर अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश मोरे व श्री. बोबडे यांनी उपोषणस्थळी जावून श्री. धुर्वे यांचे उपोषण सोडविले. यावेळी नितीन भुयार, अनिकेत घरडे, प्रमोद धुर्वे, दर्शन रामटेके, सुमित मोहोड, सचिन तायडे, तेजस मोहोड, संजय परतेकी, गौतम घोडेस्वार, सुरेश भुयार, अनंत भुयार, दिलीप टेकाडे, दिलीप बनसोड, राजेंद्र मेश्राम, सतीश हिवराळे, अनिल घरडे, विलास मोहोळ, शुभम मेश्राम, सुनील भलावी, सुनील मेश्राम, प्रशांत बावनकर, स्वप्निल घरडे, महादेव गौरखेडे, सुधीर मोहोड, योगेंद्र मेश्राम, रोहित मोहोड, आदित्य भुयार, कुणाल भुयार, प्रथमेश टेकाडे, चेतन भुयार, कुणाल केवतकर, सर्वेश भुयार, अक्षय भुयार, चंदन उके, विनोद ठाकरे, राजू बारोटकर, प्रणय बनसोड, अक्षय मोहोड, विशाल भोयर, जगदीश बनसोड, आशीष घोडेस्वार, योगीराज लांजेवार, धनराज टेकाडे, पिंटूभाऊ खंगार, बाबाराव मोहोळ, गोपाल भुयार, स्वप्निल पेढेकर, अक्षय घोडेस्वार, सागर बनसोड, सुधीर शिंगणे, रवींद्र मोहोड, धर्मराज कावरे, सुधीर मोहोड, रोशन मेश्राम, रणजीत गजभिये, सचिन गजभिये, सागर डोंगरे, धीरज इंगळे, अक्षय मोहोळ, आशीष मोहोड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

काय आहे आदेशात ?गावातील ही ई-क्लास जागा शासकीय मालमत्ता असून या जागेची देखभाव करण्याची जबाबदारी केवळ ग्रामपंचायतीकडे आहे. ही जागा ग्रामपंचायतच्या मालकीची नाही. त्यामुळे या जमिनीवर बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी किंवा तहसीलदारांची परवानीग घेणे आवश्यक आहे. याबाबत ग्रामपंचायतला निर्णय घेण्याचा अधिकार नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीने घेतलेला चुकीचा ठराव रद्द करून पुन्हा नव्याने ठराव घेवून ग्रापंची मंजुरी असल्यास ना हरकत प्रमाणपत्र द्यावे किंवा देवू नये, एवढाच अधिकार असल्याचे गटविकासअ अधिकाऱ्यांनी सरपंच व सचिवांना दिलेल्या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

# प्रेमाचा ’गुलाब’ ५० रुपयांना अन् खायचा ’गुलाब’ ५० पैशांना जगाच्या पोशिंद्याने उभ्या पिकात शेळ्या-मेंढ्या सोडून दिल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याला शेतकरी म्हणून जगणे खूप कठीण झाले आहे. शेतमालाला भाव नाही, महागाई गगणाला भिडलेली. यात वेगवेगळ्या रोगांची धाड, त्यात निसर्ग कोपलेला. अशा अनेक दुष्टचक्रात हा शेतकरी अडकलेला आहे. या शेतकऱ्यांची मुले शहरात छोट्या मोठ्या नोकऱ्या करू लागली आहेत. भविष्यात शेतकरी दिसेल का, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती येऊन ठेपलेली आहे. अनेक ठिकाणी गावातील शेते ओस पडू लागली आहेत. आजचाच विषय घ्यायचा झाला तर पत्ताकोबीला ५० पैसे प्रतिकिलोचा दर मिळाल्याने शेतकऱ्याने उभ्या पिकात शेळ्या-मेंढ्या चरण्यासाठी सोडून दिल्या आहेत. तर दुसरीकडे व्हॅलेंटाईन आठवड्यानिमित्त गुलाबाच्या फुलाला प्रति फुल ५० रुपयांचा दर आला आहे.

किती विदारक परिस्थिती सध्या शेतकऱ्यावर ओढविली आहे, याचे हे जिवंत उदाहरण आहे. काही लोक म्हणतात आधुनिक शेती करा, सिझननुसार उत्पादन घ्या. परंतू या शेतकऱ्यांना कोणते उत्पादन घ्यावे हे सांगायला देखील कोणी नसतो. त्याला जसे समजते, तसेच तो उत्पादन घेतो आणि फसतो. जेव्हा एखाद्या भाजीपाल्याची टंचाई होते तेव्हा त्याला दर मिळतो. यासाठी काहीसे लक आणि वेळ या शेतकऱ्याच्या बाजुने असावी लागते, तरच हे होते.

# विद्यापीठातील रिसर्च ॲन्ड इनक्युबेशन फाउंडेशनला स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेंतर्गत २.५ कोटींचा निधी मंजूर

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१२अमरावती**

## कुलगुरुंच्या हस्ते डॉ. स्वाती शेरेकर यांचे अभिनंदन



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च ॲन्ड इनक्युबेशन फाउंडेशनला स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेंतर्गत २.५ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या सहाय्याने उद्योजकता वाढविणे, नवोदित स्टार्टअप्सना भक्कम आर्थिक मदत देणे आणि नवसंशोधनाला चालना देणे हे उद्दिष्ट गाठता येणे शक्य होईल.

सदर निधीचा उपयोग नव्या स्टार्टअप्सना प्रोटोटाईप विकसित करणे, बाजार संशोधन करणे, उत्पादनाची व्याप्ती वाढविणे आणि व्यवसाय वृद्धिंगत करणे यासाठी केला जाणार आहे. या माध्यमातून विदर्भातील स्टार्टअप इकोसिस्टम अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने इनक्युबेशन फाउंडेशन कार्य करणार आहे. ही मोठी उपलब्धी अमरावती आणि विदर्भातील उद्योजकांसाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, महाराष्ट्रात स्टार्टअप संस्कृती विकसित करण्याच्या दिशेने विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इनक्युबेशन फाउंडेशनचे योगदान अधिक बळकट होईल. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी इंक्युबेशनच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर यांचे अभिनंदन करुन इंक्युबेशन सेंटर टीमचे भरभरुन कौतुक केले. सदर योजना मिळविण्याकरिता इंक्युबेशन सेंटरच्या संचालक प्रा. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर, श्री नरेश मोवाले, श्री रवी ढेंगळे यांनी अथक परिश्रम घेतले.